# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवायै समर्पिता

## दिनांक १६-०१-२०१४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

गुरूवार दिनांक १६-०१-२०१४ रोजी (का.प.क्र.२१) मा.महापौर सौ.कला रविनंदन ओझा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३५ वा. सुरू झाली सभेला मा. आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे, भा.प्र.से. नगरसचिव श्री.प्रमोद का.खोब्रागडे तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
२. स.स. श्री. नारायण तिलोकचंद कुचे
३. स.स. श्री. खेडकर सुशिल तुकाराम
४. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
५. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
६. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
७. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
८. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
९. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
१०. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
११. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१२. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१३. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१४. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१५. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१६. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२०. स.स.सौ.उर्मिला नितीन चित्ते
२१. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२२. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ

२३. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन
२४. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२५. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२६. स.स.श्री.शिंदे राजू रामराव
२७. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२८. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२९. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
३०. स.स.श्री.खान जहांगिर अब्बास
३१. स.स.श्रीमती जरीना म.जावेद
३२. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
३३. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
३४. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
३५. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३६. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३७. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३८. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३९. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
४०. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
४१. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
४२. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
४३. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान
४४. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
४५. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
४६. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४७. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४८. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४९. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
५०. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
५१. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
५२. स.स.डॉ. खान जफर अहेमद
५३. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान

५४. स.स.श्री.शेख हबीब शेख छोटु कुरेशी
५५. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
५६. स.स.श्री.खान आगा मिया खान
५७. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
५८. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
५९. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
६०. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
६१. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
६२. स.स.श्री. वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
६३. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
६४. स.स.श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
६५. स.स.श्रीमती शोभा पुखराज काळे
६६. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
६७. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
६८. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
६९. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
७०. स.स.श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
७१. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
७२. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
७३. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
७४. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
७५. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
७६. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
७७. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
७८. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
७९. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
८०. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
८१. स.स.श्री.अब्दुल सिकंदर अब्दुल साजेद
८२. स.स.श्रीमती घोडेले अनिता नंदकुमार
८३. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
८४. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८५. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने

८६. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन

८७. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम

८८. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नांवे</u>**

१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
३. श्रीमती पाटील रेखा दिनकरराव

श्री.गिरजानाम हाळनोर :दलित चळवळीतील जेष्ठ नेते ,दलित पँथरचे संस्थापक तसेच जेष्ठ कवी स्व.नामदेव ढसाळ यांचे दु:खद निधन झाले त्यांनी दलित समाजासाठी मोठी चळवळ उभी करून त्या समाजातील लोकांना न्याय मिळवून दिला. त्यांचे मा.बाळासाहेब ठाकरे यांचे कुटूंबीयाशी घरगुती व जिव्हाळयाचे संबंध होते. त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.सुशिल खेडकर :मनपातील सुरक्षा रक्षक स्व.जनार्धन वाघुले यांचेही - हदयविकाराने नुकतेच निधन झाले तसेच स.सदस्य श्री.समीर राजूरकर यांचे आजी स्व.लक्ष्मीबाई राजूरकर यांचे ही दु:खद निधन झाले त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.कृष्णा बनकर :जी सुचना स.सदस्यांनी मांडली त्यास माझे अनुमोदन आहे. सर्वांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.संजय केनेकर :मनपा कर्मचारी श्री.जनार्धन वाघुले स्व.नामदेव ढसाळ तसेच स.सदस्य श्री.समीर राजूरकर यांचे आजी यांचे दु:खद निधनाबदल श्रध्दाजंली अर्पण करण्याची सुचना सभागृहात मांडली त्यास भारतीय जनता पार्टीच्या वतीने माझे अनुमोदन आहे.

डॉ.जफर खान :श्रध्दाजंली अर्पण करण्या बाबत ज्या ज्या नावांची सुचना सभागृहात स.सदस्यांनी मांडली त्यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

यावेळी स्व.नामदेवरावजी ढसाळ स्व.जनार्धन वाघुले तसेच स्व.लक्ष्मीबाई राजूरकर यांचे दु:खद निधन झाल्याबध्दल सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.राजु शिंदे :या सभागृहाने ठराव पारीत केल्यानंतर त्यांची अंमलबजावणी होत नाही. सभागृह मोठे की, प्रशासन त्याची अंमलबजावणी करित नाही ते मोठे आहे. तसेच जो ठराव सभागृहात पारीत करतो त्याची अंमलबजावणी करणे प्रशासनाला बंधनकारक आहे की नाही सर्व खुलासा करावा.

श्री.मिलींद दाभाडे :प्रशासन मोठे की सभागृह याची माहिती दयावी श्री.पेडगांवकर उपआयुक्त (महसुल) यांना शासनाकडे परत पाठविण्याचा ठराव पारीत केला त्यांची अंमलबजावणी का झाली नाही ?

श्री.खाजा शरफोद्दीन :यापुर्वी किती ठराव घेतले त्यांची अंमलबजावणी का केली नाही ?

श्री.सुशिल खेडकर :विषयपत्रिका अगोदर घ्यावी त्यानंतर जनरल चर्चासाठी सभागृहात वेळ दयावा.

श्री.राजू शिंदे :अगोदर चर्चा घ्यावी. आमच्या प्रश्नाचा खुलासा करावा. सभागृहाने निर्णय घेतल्यानंतर अंमलबजावणी होत नसेल तर अवमान आहे त्यासाठी सभाच घेवू नये. अशी आमची मागणी आहे.

श्री.अफसर खान :स.सदस्य श्री.राजू शिंदे यांनी जो मुद्या मांडला त्यांचा खुलासा अगोदर करावा.

मा.महापौर :प्रशासनाने खुलासा करावा.

मा.आयुक्त :कायदयात स्पष्ट तरतुद आहे की, महानगरपालिका ही सर्वोच्च आहे.

श्री.राजू शिंदे :सभागृह सर्वोच्च आहे तर,सभागृहाने घेतलेले निर्णय प्रशासनाला पाळणे बंधनकारक आहे का ?

(या वेळी डायस समोर एकाच वेळी स.सदस्य बोलत असतात. काहीही एकु येत नाही.)

मा.आयुक्त :सभागृहाने घेतलेले निर्णय नियमाप्रमाणे पाळणे प्रशासनाला बधंनकारक आहे.

(पुन्हा या वेळी सभागृहात डायस समोर येऊन अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात. त्यामुळे आवाज स्पष्टपणे एकु येत नाही.)

श्री.राजू शिंदे :उपआयुक्त महसूल श्री.पेडगांवकर यांना परत पाठविण्याचा ठराव पारीत झाला त्याची अमलबजावणी का झाली नाही.

श्री.मिलींद दाभाडे :श्री.पेंडगावकर उपआयुक्त (महसुल) यांना शासनाकडे परत पाठविण्याचा ठराव घेतला अंमलबजावणी का झाली नाही.तर तो ठराव नियमबाहय होता का ?

श्री.समीर राजूरकर :गेल्या सहा महिण्यात सभागृहाचा मान ठेवण्यामध्ये प्रशासन कमकुवत ठरले आहे. गेल्या ९ महिण्यापासून श्री.झनझन यांचेकडे उपआयुक्तांचा चार्ज दिला त्यास सर्वसाधारण सभा स्थायी समिती सभेची मान्यता नाही.ठराव ठेवावा असे वाटले नाही का ? यापुर्वी अनेक उपआयुक्तांना येथे ठेवायचे की नाही ठराव पारीत करून दिले.सहा महिण्यापेक्षा जास्त काळ एखादया अधिका-याकडे चार्ज ठेवायचा असेल तर स्थायी समितीची, सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्याची गरज आहे १०४ सदस्य या सभागृहात आहे सर्व सदस्यांनी एकरूप भावना ठेवली असतांना प्रशासन मानायला तयार नाही. मी पहिल्यादां निवडून आलो. परंतु काही सदस्य ४-४ वेळेस निवडून या सभागृहात आहेत. गेल्या ४ महिण्यापासून विभाग प्रमुख कार्यालयात भेटत नाही. नागरीक भेटण्यासाठी आले तर अधिकारी दालनात नसतात नागरीकांच्या समस्या सोडवल्या जात नाही. अधिकारी जागेवर नसतील तर महापालिका कशासाठी आहे. उपआयुक्त (महसुल) श्री.पेडगांवकर यांना शासनाकडे परत पाठविण्याचा ठराव पारीत केला. दोन महिणे झाले त्यांना अदयाप कार्यमूक्त केले नाही तसेच कर निर्धा. व संकलक विभागाचे अधिकारी श्री.शिवाजी झनझन यांची सहा महिण्यापेक्षा जास्त कालावधी झाला. सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली नाही. त्यांनी घेतलेले निर्णय

नियमाने योग्य आहेत का? गेल्या सात महिण्यात टॅक्स असिस्टंट म्हणून ५-६ अधिकारी बदलले या सभागृहात बरेच जेष्ठ सदस्य आहेत. सर्वांचे हेच मत आहे की, सभागृहाने घेतलेले निर्णयाचे प्रशासन अंमलबजावणी का करीत नाही ?

श्री.रेणुकादास वैद्य : प्रभाग कार्यालय ब मध्ये प्रभाग सभापती व त्या प्रभागाचे स.सदस्यांनी नागरीका समवेत लहान लहान कामासाठी अंदोलन केले संबधीत अधिकारी यांना फोन करून बोलविले दोन दिवस झाले तरी श्री.झनझन हे तेथे आले नाही अशा प्रकारे बेजबाबदारपणे अधिकारी वागत असतील मग ते कोणतेही अधिकारी असो श्री.पेडगांवकर (उपआयुक्त महसुल) असतील श्री. झनझन, कर निर्धारक व संकलक असतील यांचे बाबतीत प्रशासन कार्यवाही का करीत नाही ?

श्री.काशिनाथ कोकाटे:सिडको हस्तांतर २००६ मध्ये झाले. त्या अनुषंगाने काही पदास शासनाची मंजूरी मिळाली त्यात उपआयुक्त, लेखाधिकारी अभियंता पदास व इतर अशी जवळपास १६ पदांना मान्यता मिळाली होती. ती पदे भरली. सिडको हडको भागात २ ते अडीच लक्ष लोकसंख्या आहे यामध्ये २२-२३ वार्ड येतात. तेथे मंजुरी दिलेल्या पदाचे अधिकारी तेथे सध्या नाही. उपआयुक्त हे पद कायम दिलेले नाही. प्रभाग ब मध्ये नागरीकांना कर भरण्यासाठी ३-४ वेळेस चकरा माराव्या लागतात. ५०-६० लोकांनाच फक्त एका दिवशी बील भरता येते. त्यानंतर येणारे लोकांना पुन्हा दुस-या दिवशी यावे लागते. तसेच या भागात पाण्याचा प्रश्न, रस्त्याची दयनीय अवस्था झाली व स्वच्छता ही वेळेवर होत नाही. अनेक समस्यांचा नागरीकांना सामना करावा लागत आहे. १८ कोटींची महत्वाचे रस्त्यांची कामे हाती घेण्याचे ठरले. त्यातून सिडको हडकोतील रस्ते का वगळण्यात आले? असा दुजाभाव करणे योग्य नाही. या भागातील वसुली मोठया प्रमाणात आहे. नागरीक पैसे भरणा करतात. त्यामूळे या भागात विकास कामे झाली पाहिजे याकडे प्रशासनाने दुर्लक्ष करणे योग्य नाही.

श्री.विरभंद्र गादगे :२५-३० पत्र प्रशासनाकडे दिले आहे तेथे येणा-या प्रत्येक नागरीकांना वागणूक चांगली मिळत नाही.नागरीक कर भरण्यासाठी येतात व्यवस्थित सोयी सुविधा पुरविल्या जात नाही.वार्डात नागरीकांची गर्दी होते नागरीकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्हाला आंदोलन करावे लागते. अधिकारी जागेवर उपस्थित नसतात. या भागातील नागरीकांवर अन्याय होत आहे. अधिकारी गैरवर्तनुक करतात त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे ? सिडको भाग सिडकोत असतांना सर्व सुविधा मिळत असे आता नागरीकांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते.संबधीत अधिकारी यांचेवर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

(या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.मिलींद दाभाडे :प्रशासनाने आताच खुलासा केला की नियमाप्रमाणे असेल तर कार्यवाही करतो श्री.पेडगांवकर (उपआयुक्त महसुल) यांना परत पाठविण्याचा ठराव घेतला तो नियमबाहय होता का ? याचा खुलासा करावा.

मा.आयुक्त :श्री.पेडगावकर यांना शासनाकडे परत पाठविण्याचा ठराव पारीत झाला त्यानंतर मा.महापौर यांनी शासनाकडे पत्रव्यवहार केला त्याबध्दल शासनाने प्रशासनाकडे अहवाल मागितला शासनाकडे अहवाल सादर केलेला आहे शासनाकडून जो निर्णय येईल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल.

श्री.अफसर खान :यापुर्वी अनेक उपआयुक्त यांना परत पाठविण्याचा ठराव झाल्यानंतर लगेच २-३ दिवसात कार्यमुक्त केले जात असे. श्री.पेडगावकरांच्या बाबतीत शासनाकडे पत्रव्यवहार करून वेळ काढण्याचा प्रयत्न केला जातो आहे, हे बरोबर नाही. सभागृहाचा मान ठेवावा. ठराव पारीत झालेला आहे. त्यांना शासनाकडे परत पाठविण्यात यावे तात्काळ कार्यमुक्त करावे.

श्री.समीर राजूरकर :सभागृहाने निर्णय घेतल्यानंतर प्रशासनाने आयुक्त म्हणून त्यांना कार्यमुक्त करायला पाहिजे होते. शासनाने अहवाल मागितला २ महिणे ठराव पारीत होवून झाले कार्यवाही होत नाही त्यांनी घेतलेले निर्णय आम्ही कसे मान्य करणार श्री.झनझन, कर मुल्य निर्धारक व संकलक यांचेकडे ९ महिन्यापासून चार्ज दिला ते निर्णय घेत आहे ते आम्ही कसे मान्य करणार. एका अधिका-याच्या बाबतीत एक न्याय, दुस-यांच्या बाबतीत दुसरा न्याय, हे योग्य नसून, जे अधिकारी जनतेच्या भावणेशी खेळतात त्यांना नागरीकांना उत्तर देण्याची तयारी नसते अशा अधिका-यांना प्रशासन पाठीशी घालत असेल तर योग्य नाही.

श्री.राजू शिंदे :यापूर्वी उपआयुक्त (महसुल) श्री.पेडगावकर यांना शासनाकडे पाठविण्याचा ठराव पारीत केला, अंमलबजावणी होत नाही. आज पुन्हा ठराव घ्यावा व मंजूरी दयावी. त्यानुसार मा.आयुक्त यांनी त्यांना आजच्या आज कार्यमुक्त करावे ते कार्यमुक्त होत नाही तोपर्यत आम्ही सभा चालवू देणार नाही.

मा.महापौर :ठराव यापुर्वी घेतलेला आहे प्रशासनाने श्री. पेडगांवकर उपआयुक्त (म) यांना ताबडतोब मनपा सेवेतून कार्यमूक्त करावे व शासनाकडे पाठविण्यात यावे.

(या वेळी डायस समोर अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात. काहीही एकु येत नाही.)

मा.महापौर :सर्व स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. डायस समोर कुणीही येऊन बोलु नये.

श्री.सुशिल खेडकर : नागरीकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सभेचे आयोजन केले जाते. सभेमध्ये सविस्तर चर्चा होवून निर्णय होणे अपेक्षीत असते. स.श्रीमती पुष्पा सलामपुरे त्यांचे वार्डातील विकास कामाच्या संदर्भात उपोषणास बसलेल्या आहेत. त्यांचा प्रश्न काय आहे? तो समजावून घेवून त्यांचे उपोषण सोडविण्यास प्रशासनातर्फे शहर अभियंता यांना पाठवावे.

श्री.संजय केनेकर :सर्वच वार्डात विकास कामा संदर्भात समस्या आहे सर्व भागात विकास कामे व्हावीत. असे आम्हाला वाटते.

श्री.मिलींद दाभाडे :श्री.पेंडगावकर उपआयुक्त (महसुल) यांना प्रशासन केंव्हा कार्यमुक्त करणार आहे. यावर खुलासा करावा.

श्री.संजय केनेकर :चर्चा करण्याचा अधिकार सर्वांना आहे. हे व्यासपिठ म्हणजे खेळणी नाही. या सभागृहाचे जे कामकाज चालते ते जनतेपर्यंत जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाची घटना तयार केली. त्यातून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कायदयाचा जन्म झाला. सभागृहात एखादया अधिका-याच्या बाबतीत निर्णय होतो. त्याची अंमलबजावणी होत नाही. यामध्ये प्रशासनाची भुमिका काय आहे?

श्री.त्रिंबक तुपे :सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता या बाबत निर्णय घ्यावा. अशी अपेक्षा आहे.

मा.महापौर :प्रशासनाने ताबडतोब निर्णय घ्यावा.

मा.आयुक्त :या विषयी शासनाने प्रशासनाकडे विचारणा केली,अहवाल मागितला होता. शासनाला अहवाल दिलेला आहे. पुढच्या आठवडयात या विषयी शासनाकडे सभागृहाच्या भावना कळविण्यात येवून योग्य तो निर्णय घेणे बाबत कार्यवाही होईल.

श्री.राजू शिंदे :श्री.पेडगांवकर उपआयुक्त (महसुल) यांना परत पाठविण्याचा निर्णय प्रशासनाने आजच घ्यावा. शासन प्रस्ताव विखंडीत करील तेव्हा करील त्यानुसार परत त्या पध्दतीने कार्यवाही करता येईल. परंतु उपआयुक्त उपआयुक्त (महसुल) यांना आजच कार्यमुक्त करावे.

(यावेळी एकाच वेळी स.सदस्य बोलत असतात स.सदस्य श्री.राजू शिंदे हे डायस वरील राजदंड उचलतात वेळ दु.१२-३० वाजता. त्यामुळे सभागृहात सर्व सदस्य डायस समोर येतात.)

श्री गिरजाराम हाळनोर:स.सदस्याचे आजचे सभासदत्व रद्य करावे.असे गैरवर्तन त्यांनी सभागृहात करणे योग्य नाही.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :सभागृहात असे गैरवर्तन करणे बरोबर नाही त्यांचे सभासदत्व रद्य करावे.

श्री.समीर राजूरकर :आम्ही तक्रार दिली त्यानंतर शासनाने अहवाल मागितला १०४ सदस्यांनी निर्णय घेतला हा सभागृहाचा अवमान आहे शासनाचे नाव मध्ये घेवून कार्यमुक्त केले जात नाही ही काम करण्याची पध्दत बरोबर नाही.

(या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी डायस समोर बोलत असतात व पुन्हा उपआयुक्त (महसुल) यांचे बाबत जोरजोरात बोलतात.)

मा.महापौर :श्री. पेंडगावकर उपआयुक्त (महसुल) यांना आजच्या आज प्रशासनाने कार्यमुक्त करावे असे प्रशासनास आदेशीत करण्यात येते.

श्री.राजू शिंदे :आज त्यांना कार्यमुक्त करावे. शासनाचा जो निर्णय येईल तो येईल. त्यानुसार कार्यवाही होत राहिल.

मा.महापौर :सभा ०५ मिनिटासाठी ‘ तहकूब ’ करण्यात येते. (वेळ १२-३५ वाजता पुन्हा १-२० वा.सभेला सुरूवात)

श्री.मुजीब खान :अधिकारी शासनाकडे परत पाठविणार अशी चर्चा होते. तर विकास कामे कोण करणार आहे ? कुणावर जबाबदारी देणार आहे ? संबंधीत अधिकारी यांना का पाठवायचे? त्यांची चुक काय आहे? याची सविस्तर माहिती दयावी.

श्री.सुशिल खेडकर :यावर ब-याच वेळ पासून चर्चा चालू आहे यात प्रशासनाची काय भुमिका आहे? खुलासा घ्यावा.

मा.आयुक्त :आताच मा.महापौर समवेत ॲन्टी चेंबरमध्ये चर्चा झाली की, शासनाकडील श्री.पेडगांवकर उपआयुक्त (महसुल), श्रीमती केसरकर, श्रीमती सपना वसावा, श्री.ढाके सहा.आयुक्त या चार अधिका-यांना शासनाकडे पाठवावे. परंतु महापालिकेत अधिकारी वर्ग कमी आहे. या सर्वांना शासनाकडे पाठविणे शक्य होणार नाही. कामामध्ये अडचणी येतील. सर्वच कामे आयुक्त करू शकत नाही. असे करणे संयुक्तीक होणार नाही असे नम्रपणे सभागृहात बोलतो.

श्री.राज शिंदे :श्री.पेडगावकराच्या बाबतीत काय निर्णय घेणार आहे ?

मा.आयुक्त :एकाच अधिका-याच्या बाबतीत सभागृहाला मान्य असेल तर श्री.पेडगांवकर उपआयुक्त (महसुल) यांना तातडीने शासन निर्णयाच्या अधिन राहून कार्यमुक्त करण्यात येईल.

श्री.राजू शिंदे :यापुर्वी ॲटो टिप्पर भाडयाने लावले त्यानंतर कोणतीही निविदा न काढता ३१ टिप्पर लावले. त्यानंतर महापालिकने ४० ॲटो टिप्पर खाजगी संस्थेला भाडयाने देणेसाठी ई-टेडरींग मागविले. त्यानुसार तसा प्रस्ताव प्रशासनाच्या मार्फत आला महापालिका ही वाहने वापरून काम करू शकत नाही. म्हणून भाडयाने देतो अशी धारणा प्रशासनाची झाली असेल. ॲटो टिप्पर भाडयाने देत आहोत महापालिकाला चालविण्यास खाजगी संस्थेला देणार काय ? तसेच ई-टेंडरींग होते,ती शासनाच्या नियमाप्रमाणे मागविले जाते का ?

शहर अभियंता :निविदा प्रक्रिया ही पीडब्ल्युडी विभागाच्या नियमानुसार मागवितो हा विभाग शासनाच्या अंतर्गत काम करतो.

श्री.राजू शिंदे :निमयमानुसार तीन निविदा प्राप्त असेल व त्या निविदा प्रोसेसनुसार अपुर्ण असेल,बरोबर नसेल तर त्या उघडल्या जातात का ?

शहर अभियंता :विशिष्ट प्रकरणात केस टू केस आपण निर्णय घेत असतो.

श्री.मीर हिदायत अली:ई-टेडरींग केल्यास एक निविदा आली तरी व एक पेक्षा जास्त आल्या तरी टेंडर उघडायला पाहिजे एक निविदा आली तर टेंडर उघडू नये असे बंधनकारक नसते.

शहर अभियंता :टेंडर जे येतील ते उघडावेच लागते परंतु ते स्वीकारायचे की नाही हा तांत्रिक मुद्दा आहे. काही प्रकरणात प्रशासनाला त्यांचे अधिकार वापरावे लागतात एखादे काम तातडीने करायचे असेल तर प्रशासनाला निर्णय घ्यावे लागते.

श्री.अफसर खान :तीन निविदा असेल तरच उघडता येते.

श्री.राजू शिंदे :तीन निविदा आल्या तीनही निविदा अटी शर्तीची पुर्तता करीत नाही फेरनिविदा मागणे योग्य राहिल असे जे.ई ने संचिकेत लिहिले,असे असतांना निविदा अंतिम होते हे योग्य वाटत नाही.

शहर अभियंता : हे निविदा नुसार हे काम नागरीकाच्या आरोग्याच्या संबधीत आहे.

श्री.राजू शिंदे :आपण महापालिकेचे काम करतो हे काम नियमाने झाले पाहिजे. असे आम्हाला वाटते.

श्री.मिलींद दाभाडे :सर्व नियम धाब्यावर बसून हे टेंडर काढले गेले आहे. ते बरोबर नाही. योग्य ती कार्यवाही व्हावी.

क.अभियंता(श्री.पंडीत):तीन निविदा आलेल्या होत्या दोन अपात्र होत्या तिसरी निविदा धारक एजन्सीला कामाचा अनुभव होता. ३१ रिक्षा लावायचे आहेत.

श्री.राजू शिंदे :अंबिका नावाची एजन्सीने अट क्र.२ची पुर्तता केली नाही तरी निविदा दिले जाते. ते कोणत्या आधारे ?

श्री.कृष्णा बनकर :जे या प्रकरणात दोषी असेल त्याचेवर प्रशासनाने कार्यवाही करावी.

क.अभियंता(श्री.पंडीत):यांत्रिकी विभागामध्ये काम करणेसाठी कर्मचारी कमी आहे. मॅकेनिकल कर्मचारी कमी आहे. वाहनाची दुरूस्ती व इतर काम हे बाहेरुन आऊट सोर्सीगने काम करून घेतो.

श्री.राजू शिंदे :अट क्र.२ ची अंबीका एजन्सी पुर्तता करीत नव्हती तरी टेंडर का उघडले ?

क.अभियंता(श्री.पंडीत):तीन निविदापैकी १ पात्र होती म्हणून स्विकारली आहे.

---

श्री.राजू शिंदे :एकही एजन्सी पात्र नव्हती संचिकेत लिहिले तरी काम देता हे बरोबर नाही. मा.आयुक्तांनी या प्रकरणाची दखल घ्यावी.

श्री.संजय केनेकर :‘भ्रष्टाचार थांबवा गैर पध्दतीने कोणतेही काम होवू नये महापालिकेचे नुकसान होईल असे काम करू नये.’

श्री.राजू शिंदे :ज्यांनी एजन्सी पात्र नाही असे लिहिले तेच आता सांगतात की, एक एजन्सी पात्र होती म्हणून काम दिले.शिवाय शासनाच्या जी.आर. नुसार कार्यवाही केली नाही, असे माझे मत आहे.

श्री.त्रिंबक तुपे :हा सिरीयस विषय आहे महापालिकेचे नुसार होत असेल व नियमाने अधिकारी काम करीत नसेल तर त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री.राजू शिंदे :१ लक्षचे काम वार्डात होत नाही मोठमोठे घोटाळे होत आहे याचे पाठीमागे कोण पदाधिकारी आहे त्यांचे नाव समोर यावे.

श्री.मीर हिदायत अली:यात कोण पदाधिकारी आहे नाव सांगावे.

(या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात. काहीही एकु येत नाही.)

मा.महापौर : मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.राजू शिंदे : जे टेंडर दिले ते अबाऊ मध्ये दिले याचे पाठीमागे कोणकोण आहे ते स्पष्ट व्हावे.जेवढे खर्च होतो तेवढयात हे टेंडर दयायला पाहिजे होते १.२३ लक्ष जास्तीने टेंडर दिले.

श्री.अफसर खान :टेंडर रिकॉल का केले नाही.

क.अभियंता (श्री.पंडीत):६ महिण्यात डिझेलचे दर वाढलेले आहे.

श्री.राजू शिंदे :ठेकेदाराचे हित जोपासण्यासाठी १.२३ लक्षने जास्त दिले. यात मनपाचे नुकसान झाले. यात अबाऊ टेंडर आले. मा.आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले नाही. गोलमोल करून मा.आयुक्तांची स्पेशल मंजूरी घेतली. प्रशासनाने दखल घ्यावी जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

क.अभियंता(श्री.पंडीत):यात शिफारस केली होती त्यानंतर मा.आयुक्तांची मंजूरी झाली.दोन एजन्सीला कामाचा अनुभव नव्हता त्यांचे प्रमाणपत्र नव्हते.

श्री.अफसर खान :यात भ्रष्टाचार झालेला आहे गंभीर विषय आहे मा.आयुक्तांनी दखल घ्यावी.जे दोषी असेल त्यांचेवर मा.आयुक्तांनी कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :या तीनही एजन्सीला अनुभव नाही. अट क्र.२ चे पालन केलेले नाही. तरी टेंडर का देण्यात आले. चुकीच्या कामामूळे महापालिकेची आर्थीक परीस्थिती खालावली आहे.

श्री.सुशिल खेडकर :हा गंभीर विषय आहे यात प्रशासनाने चौकशी करावी असे आदेशीत करावे चौकशीसाठी कालावधी दयावा.

श्री.राजू शिंदे :महापालिकेत भ्रष्टाचार होत असेल आणि त्यात पदाधिकारी अधिकारी सामिल असेल तर नावे जनतेला कळायला पाहिजे.यात असलेल्या एजन्सीचे मालकाचे नाव सांगावे.

क.अभियंता(श्री.पंडीत):अंबिका सह. संस्थेचे मालक हरीदास भुजाने आहेत.

श्री.राजू शिंदे :ॲटो टिप्पर १० दिले त्यानंतर ३१ देण्यात आले आता ४० ॲटो टिप्पर देण्याचे ठरले. ही संस्था मा.सभापती यांचेच वार्डातील आहे जयभवानी सहकारी पत संस्था जी आहे त्या संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ आहे त्यांचे अध्यक्ष मा.सभापती आहे. श्री. हरीदास भुजाळे हे या संस्थेतील व्यक्ती आहे.

श्री.सुशिल खेडकर :वैयक्तिक आरोप कुणी करू नये.

श्री.नारायण कुचे :असे आरोप करणे बरोबर नाही. यापुर्वीचे चेअरमन यांनी कंपनी चालू करून सर्व बोगस कामे केली.

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी या प्रकरणाची येत्या १५ दिवसात सविस्तर चौकशी करून सबंधीत जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करून अहवाल सादर करावा.

(या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी डायस समोर बोलत असतात.)

श्री.मुजीब खान :सभागृहात विकासाच्या मुद्यांवर चर्चा होणे गरजेचे आहे. प्रशासन व महापालिका सभागृह जोपर्यंत एकत्र येत नाही तोपर्यंत कामे होणे शक्य नाही. प्रशासनातील खालचे अधिकारी कर्मचारी चुकीची कामे करीत आहे. रोषणगेट भागात एका मिळकतीला ५० वर्षापासून टॅक्स लागलेला असून ती व्यक्ती तेथे राहते पुन्हा त्याच इमारतींना कुणी तरी डुप्लीकेट रजिस्ट्री वगैरे केली कर्मचारी यांनी त्या लोकांशी सल्लामसलत करून रातोरात बसून रजिस्टर मागवून टॅक्स आकारणी करून पेपर दिले. दुसरे असे, एकाची दुकान त्यांचे नावाने किराया आला ज्यांनी घेतले

त्यांचे नावाने दुकान केले. सन २०११ पर्यंत पैसे भरणा केले. २०१२-१३ ची कर मागणी साठी मनपाचे कर्मचारी त्यांच्याकडे गेले व गुंडागर्दी करून दुकान सील होते. संबंधित व्यक्ती सन २०११-१२ चे पैसे भरण्यास तयार होते. त्यांचे कडून २० हजार रक्कम घेतली, घर मालीक यांचे नावे भरणा केले. एकाकडून वसुली आणि दुस-याच्या नावे कर भरणा केले जाते. खालचे कर्मचारी चुका करतात दुस-याचे नावे सांगून पैसे घेवून चुकीचे काम करीत आहे. या बाबत मा.आयुक्तांनी दखल घ्यावी. (या संबधीचे सर्व कागदपत्र मा.आयुक्ताकडे देतात.)

श्री.मीर हिदायत अली:मालमत्ताचा सर्वे करण्याचे काम चालू होते आता काम चालू आहे की बंद आहे. खुलासा करावा.

कर निर्धारक व संकलक:कमर्शिलय मालमत्तेचे सर्वेक्षण केले. पुर्ण शुटींग घेतले. सीडी तयार आहे. ३ प्रभागातील मालमत्ताचे असीसमेन्ट केले. प्रभाग अ ब इ चा सर्वे झालेला आहे. प्रभाग क ड फ चा सर्वे चालू आहे.

श्री.मीर हिदायत अली:लहान मालमत्तांना टॅक्स लावण्यास यंत्रणा फिरते. परंतु मोठमोठया मालमत्ता सोडल्या जात आहे. मकबरा मागे आसाराम बापू याची कमर्शिलय मालमत्ता आहे. तेथे ७८०/-रू टॅक्स लावण्यात आला. सर्वेक्षणामध्ये एवढी मोठी मालमत्ता कशी सुटली गेली. ही बाब योग्य नाही. डिक्लेर स्लम भागातील मालमत्ता जसे, संजयनगर, बायजीपूरा भागात एक मातीचे घर ३० वर्षापुर्वीचे तेथे दुकान आहे. त्यास २ लक्ष कराची नोटीस दिली. पुर्वीचा टॅक्स ३ हजार सुनावणीचा वेळी अधिकारी यांचे समोर प्रकरण आले १६ हजार टॅक्स केला, इल्लिगल प्रॉपर्टी म्हणून १६ हजार चे ३२ हजार केले. डबलची आकारणी केली अशा प्रकारामूळे मनपाची वसुली होणे ऐवजी वादग्रस्त प्रकरण होऊ लागले आहेत. डिक्लेर स्लम मधील प्रॉपर्टी लिगल नाही तेथील नागरीकाकडे पी आर कार्ड नाही रजिस्ट्री नाही बांधकाम परवानगी दिली जात नाही ३० वर्षापुर्वीचे जुने घर आहे टॅक्स पावती माझेकडे आहे सदर पावती आपणाकडे देतो प्रशासनाला योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

श्री.नासेर खान :ती प्रॉपर्टी त्यांची नाहीत फसवणूक करून ती हडप केलेली आहे.

श्री.मुजीब खान :लहान प्रॉपर्टीना ३००-४०० रू टॅक्स आता पुन्हा वाढीव नोटीस देवून दादागिरी केली जात आहे. त्याच बाजूला मोठमोठया इमारती उभ्या त्यांना टॅक्स लागला नाही.या बाबत प्रशासनाकडे यादी सहीत पत्र दिले अद्यापही कार्यवाही होत नाही. कर्मचारी पैसे घेतात पुन्हा त्या इमारत मालकाकडे जात नाही. जे नागरीक व रेग्यूलर टॅक्स भरणा करतात त्यांना पोलीसांचा धाक दाखवून प्रशासनाच्या वतीने कार्यवाही होते आणि जे ३०-३५ वर्षापासून लोक राहतात त्यांना त्रास देण्याचे काम महापालिका करीत आहे.तेंव्हा समन्वय ठेवून संबधीत विभागाने काम करावे.

श्री.समीर राजूरकर :कर आकारणी विभागासाठी नियमित अधिकारी असावे, सहा महिण्यात अनेकांकडे चार्ज जातो टॅक्स लावण्या साठी किंवा वसुल करण्याकरीता आम्ही अडवणूक केली नाही जे वर्षानुवर्ष टॅक्स भरतात त्यांना ३१ मार्च २०१३ पर्यंत महापालिकेचे नियम दाखवून टॅक्स भरण्यास लावला जो टॅक्स भरतो त्यांचे मागे तगादा. २०-२० वर्षापासून जे टॅक्स भरीत नाही त्त्यांना ५०० रू. टॅक्स असतांना दुर्लक्ष होते.जेंव्हा टॅक्स लावण्या बाबत स्ट्रक्चर केले तेंव्हा ठरले की,प्रत्येक वार्डाचा ब्लॉकवाइज सर्वे असावा. कमर्शियल किती,निवासी किती,सेवाभावी संस्था किती असा चार्ट असायला पाहिजे हे न करता ५-५ अधिकारी मिळून एक संचिका हॅण्डल करतात एक अधिकारी एक वेगळे तर, दुसरे अधिकारी त्या संचिकेवर वेगळे लिहून टॅक्स लावला यामूळे सामान्य लोकांची प्रशासनाने पिळवणूक चालू केली असे वाटते.एक व्यक्ती १९८७ पासून कमर्शिलय टॅक्स भरतो सन २०१३ पर्यंत टॅक्स भरलेला असतांना सदर व्यक्ती दवाखान्यात असतांना, त्यांना फोन करून आजच टॅक्स भरावा कींवा धनादेश दयावा अशी धमकी देतात.आणि पोलीस घेवून जातात ही बाब योग्य नाही. यासाठी ब्लॉकवाईज सर्वे करावा, जे रेग्युलर भरणा करतात त्यांना कालावधी दयावा यासाठी नियोजन होणे आवश्यक आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :आर्थीक उत्पन्न वाढावे सर्व मालमत्तांना कर लागला पाहिजे अशी सर्वांची भावना आहे परंतु खालचे कनिष्ठ कर्मचारी १० हजार टॅक्स असेल तर ५० हजार सांगून समोरच्या व्यक्तीला कागदोपत्री दाखवतात नंतर चिरीमिरी घेवून पुन्हा १० हजाराची अधिकृत नोटीस देवून टॅक्स भरणा करून घेणार हे प्रमाण जास्तीचे वाढले आहे. कुणी पैसे देण्यास तयार झाले नाही तर, वाढीव नोटीस देवून टाकणार, बाजूच्या व्यक्तीला जो टॅक्स तो असावा असे लोक विनंती करतात. तरीही ऐकले जात नाही. २५ हजार भरा नंतर २५ हजारासाठी हेंरीग घेवून कार्यवाही करू असे सांगितले जाते.सर्व भागात टॅक्स लावण्यासाठी यंत्रणा गेली पाहिजे. एकाच ठिकाणी वारंवार जावून नागरीकांना त्रास देणे योग्य नाही.खालचे कनिष्ठ कर्मचारी यांना समज देवून त्यांचेकडून प्रॉपर्टीचे अंदाजपत्रक करून घ्यावे.या पध्दतीने काम करण्याचे आदेशीत करावे.

श्री.कृष्णा बनकर :स्लम भागात वारंवार जावून वसुली करतात माझा प्रभाग स्लम ज्यांनी पैसे दिले त्यांना कमी टॅक्स आकारणी,१०-१५ लोकांना सेम प्रॉपर्टी असतांना कमी जास्त कर आकारणी कनिष्ठ कर्मचारी यांचेकडून केली यासाठी टेक्नीकल कर्मचारी टॅक्स लावण्याकरीता देण्यात यावे.

श्री.बाळासाहेब मुंडे :गुंठेवारी भागातील घराचे संचिका क्लिअर करीत नाही परंतु टॅक्स नोटीस दिली जाते.

श्री.त्रिंबक तुपे :शहरात ३०-४० टक्के मालमत्तांना आजही टॅक्स लागलेला नाही. जुन्या इमारतींना जो पुर्वीचा ३००-५०० रू. असेल तो आजही तेवढाच आहे. सर्वेक्षण होते तर तो वाढवायला पाहिजे. टॅक्स लावण्या संदर्भात ३ प्रकारची वर्गवारी करण्यात आली. त्याप्रमाणे टॅक्स लावण्यात येत असे,

परंतु जयभवानीनगर भाग स्लम असून तेथे घर दुकान असेल, त्यास गुंलमंडी निराला बाजार भागातील मार्केट प्रमाणे टॅक्स लावण्यात येतो. सरसकट टॅक्स लावू नये.एरिया बघून तेथील मार्केट बघून कर लावावा.

श्री.गिरजाराम हाळनोर:नवीन मालमत्तांचा सर्वे करण्यासाठी १००-१५० कर्मचारी नॉन टेक्नीकल होते.ती प्रॉपर्टी कुणाची, किती टॅक्स होता, मेजरमेन्ट कसे घ्यावे, किती कर लावावा काहीही माहित नव्हते. त्या कर्मचा-यांनी पुन्हा ॲसिसमेंन्ट करून ज्यांनी टॅक्स भरणा केला त्यांना पुन्हा नवीन दराने नोटीस जात आहे.यामूळे महापालिकेचे उत्पन्न कमी येत आहे.ज्यांनी बांधकामात बदल केला नाही जास्तीच्या नोटीसेस गेल्या अशांना बोलावून प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.राजू शिंदे :या विभागासाठी टेक्नीकल अधिकारी असावे कर निर्धारक व संकलक करण्याचे काम श्री.झनझन यांना येत नाही टेक्निकल माहिती त्यांना नाही.त्यांचे ते फिल्ड नाही.जे अधिकारी त्यासाठी आले श्री.किशोर बोरडे उपआयुक्त (सिडको )यांचेकडे त्या विभागाचे काम दयावे.

श्री.मुजीब खान :यापुर्वी टॅक्स लावण्यात,वसुली करण्यात ज्यांनी भ्रष्टाचार केला रजिस्टरचे पाने फाडली त्या लोकांना निलंबीत केले त्यांनी पैसे वगैरे भरणा केले पुन्हा कामावर घेवून त्याच विभागात देण्यात आले.अशा कर्मचा-यांना त्या विभागात काम देवू नये.

(या वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.काहीही ऐकू येत नाही.)

श्री.संजय चौधरी : टॅक्सच्या संदर्भात अनेक तृटी आहे. चिकलठाणा परीसरात जवळपास ५०० लोकांना टॅक्स लावण्यास मी मदत केली एखादया प्रॉपर्टीला टॅक्स लावावा असे सांगितले तर वाढवून लावला जातो.खालची यंत्रणा बरोबर काम करीत नाही. भ्रष्टाचार केल्याशिवाय कर आकारणी केली जात नाही. चिकलठाणा परीसरात मलीकार्जुन पेट्रोलपंपलाची दीड एकर क्षेत्र त्यास २४३८रू इतका टॅक्स लावला आणि त्याच बाजूला गोकुळ जाधव नावाचे व्यक्ती यांना ८४ हजार टॅक्स आकारला. तो कमी करून आता ४४ हजार केला.या दोन्ही मध्ये मोठी तफावत येते वर्ग ४ कर्मचारी टॅक्स आकारणीस ते पैसे घेवून टॅक्स कमी करतात कमर्शिलय मालमत्तेस ६७रू टॅक्स आहे कासलीवाल प्रॉपटीज मध्ये सारखी घरे आहेत तेथे कमी जास्त टॅक्स आकारला यामूळे जे टॅक्स भरणारे आहेत ते टॅक्स भरीत नाही. यामूळे मनपाचे उत्पन्न कमी येते.याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.महेश माळवतकर:उत्पन्न येत नाही म्हणून २-३ महिण्यापासून विकास कामे होत नाही. एलबीटी नंतर मालमत्ता करातून उत्पन्न येते. मनपाची स्थापनेला ३० वर्ष झाले तरी अदयाप मालमत्ताचा सर्वेक्षण करू शकत नाही. उत्पन्न वाढावे यासाठी मालमत्ता वसुली विभाग सक्षम करावा. जे नियमित कर भरणा करतात त्यांना दमदाटी होते काही इमारतीना वर्षानुवर्षे कर लावलेला नाही मंगलकार्यालयास निवासी टॅक्स आहे कर्मचा-यांना हाताशी धरून टॅक्स कमी करतात तोही वेळेवर भरणा करीत नाही. गरीबांकडे

वसुलीसाठी पथक येते मोठया मालमत्ताची वसुली होत नाही.कमर्शिलय मालमत्ताकडे लक्ष देण्याची गरज आहे उत्पन्न वाढले तर विकास होतील. ठराविक स.सदस्यांनी सांगण्यावरून त्याच भागात कामे न होता सर्व वार्डातील विकास कामे व्हावी. सन २०१३-१४ मधील बजेटमधील कोणत्या भागात कामे झाली अनेक महिला सदस्या नवीन स.सदस्य यांचे वार्डात कामे नाही.ठराविक सदस्यांचे वार्डात कामे होत असेल तर ते योग्य नाही.ज्या भागातून नागरीक कर भरणा करतात तेथे कामे व्हावी.कुठेही दुजाभाव न होता ९९ वार्डात कामे व्हावीत.

श्री.संजय केनेकर :आमच्या वार्डातील कामे व्हावी.स.सदस्य जे बोलले ते बरोबर आहे हया सर्व सामान्यांच्या भावना आहेत.हे प्रशासनाने समजून घ्यावे.

श्रीमती प्रिती तोतला : रस्ता रूंदीकरणाच्या माध्यमातून रोड वॉयडींगची कामे सुरू केली संबंधीत ठेकेदारानी बिले घेतली परंतु कामे पुर्ण झाली नाहीत. नवीन रस्त्याच्या कामाची गती नाही. नागरीकांच्या रोष आमच्यावर असतो. वार्डातील केंव्हा कामे सुरू होणार आहे.

मा.आयुक्त : एक महिण्यात काम सुरू होईल.

श्रीमती सविता सुरे :हर्सुल टी ,पॉईंट ते पीसादेवी या डीपी रोडची होण्याची मागणी होती. स.पदाधिकारी , अधिकारी यांनी येथे पाहणी केली. ३६ मीटरचा हा रस्ता लवकरात लवकर व्हावा. २५-३० हजार लोकसंख्या असलेली येथे वसाहत पावसाळयाच्या दिवसात नागरीकांना अतिशय त्रास सहन करावा लागतो.याबाबतीत तातडीने कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

---

श्री.सुशिल खेडकर : ३६ मी.रस्ता डीपी प्लॅन मध्ये आहे.ज्याची जागा येते ते नागरीक जाण्यास मज्जाव करतात. भुसंपादनासाठी निधी लागेल तो नंतरचा भाग असून तुर्त तो रस्ता ताब्यात घेण्याचे प्रशासनास आदेशीत करावे.

श्री.गजानन बारवाल :हा भाग एमआयडीसी भागाकडे जातो. ती जागा घेवून हा रस्ता विकसीत करणे अत्यंत गरजेचे आहे.या रस्त्याची मा.खासदार यांनी पाहणी केली कार्यवाहीचे आदेशीत करावे.

श्रीमती कमल नरोटे :माझ्या वार्डातील गुंठेवारीच्या संदर्भात असलेल्या संचिकेस मान्यता का होत नाही याची माहिती देण्यात यावी.

श्रीमती साधना सुरडकर:जैन शाळेच्या बाजूच्या रस्त्यावर आपण पाहणी केली होती. तेथे पावसाळात मोठया प्रमाणात पाणी साठते. पाण्याचा निचरा काढण्यासाठी ड्रेनेज लाईन किंवा पाणी नाली करण्याचे काम करणार होते. अदयाप काम सुरू केले नाही.आपण पुन्हा संबधीत ठिकाणी पाहणी करावी व काम करण्याचे आदेशीत करावे.

श्री.गिरजाराम हाळनोर :प्रशासनाने प्रत्येक वार्डातील स्पील ओव्हरची कामे तातडीने करावी.

श्री.अशोक बेहडे :लिटल फ्लावर हायस्कूल ते विदयापीठ गेट पर्यतचे रस्त्याचे काम अपुर्ण आहे ते काम का होत नाही याची माहिती घ्यावी.

---

श्री.अनिल जैस्वाल :वार्ड ब मध्ये अधिकारी उपस्थित नसतात.या प्रभागातून मोठे उत्पन्न मिळते नागरीकांच्या मागणी नुसार हे कार्यालय स्वतंत्र ठिकाणी असावे.

श्री.नासेर खान :वार्डात विकास कामे होत नाही. जबाबदारी घेण्यास कुणी तयार नाही. सिल्लेखाना परीसरात माझ्याकडे वक्फ बोर्डचे कागदपत्र त्यातील ३०३ एकर जागा मनपाची ज्याचा पी आर कार्ड नं १७८७९ स.नं. ९१ आहे प्रशासनाने परवानगी दिली आहे.कुणाच्या सांगण्यावरून दिली.महाराष्ट्र वक्फ बोर्ड का गंजीद का नंबर २५७ आहे.(सदर जागेची कागदपत्र मा.महापौराकडे देतात.)

सहा.संचालक(न.र) :जो सीटीएस नंबर सांगितला तेथे निर्माण भारतीला त्यांचे पीआर कार्डवरील मालकी हक्कानुसार परवानगी दिली.

श्री.नासेर खान :वार्डातील कोणतेही काम होत नाही मोठया खेदाने ही बाब सांगावेसे वाटते.

श्रीमती कमल नरोटे :नाल्याचे चोकअप झाले त्याबाबत एक पत्र दिले कार्यवाही मात्र अजूनही करीत नाही.

मा.महापौर :स्पील ओव्हरची अनेक कामे थांबलेली आहे. ती तात्काळ सुरू करण्यात यावी.प्रशासनाने संबधीत अधिकारी व शहर अभियंता यांना तसे आदेशीत करावे.

माआयुक्त :स.सदस्य श्री.नासेर खान यांनी जागेच्या संदर्भात दिलेल्या कागदपत्रानुसार तपासणी करून कार्यवाही होईल.

डॉ.जफर खान :कर विभागाच्या संबधी स.सदस्यांनी प्रश्न मांडले. दिनांक ४-५-२००६ च्या जी आर मध्ये कोणत्या अधिका-याकडे कोणती कामे द्यायची याचा आकृतीबंद दिला आहे.अग्निशामन विभाग अत्यावश्यक सेवेत मोडतो. अशा अधिकारी यांना इतरत्र काम नियमाने देता येते का?

मा.आयुक्त :अधिकारी वर्ग मनपात कमी आहे.त्यांचेकडील काम सांभाळून ॲडीशनल काम देता येते.त्यांना काम देवू नये असेही नियमात नाही.

---

## मुळ विषय पत्रिका

**विषय क्रमांक ४३५:-**

दिनांक १९.१२.२०१३ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक २०), तसेच मंगळवार दिनांक ३१.१२.२०१३ (दिनांक १९.१२.२०१३ ची तहकुब) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. (विषय क्रमांक ३८० ते ४३४).

**चर्चा :-**

श्री. विजेंद्र जाधव : इतिवृत्तातील विषय क्रमांक ३९९ स्थगित ठेवण्यात आला होता त्यास मंजुरी देण्यात यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : इतिवृत्तातील पान क्र २१ वर विषय क्रमांक ४०८ संदर्भात मी ब्रीजवर रस्त्याच्या बाबतीत चर्चा केलेली होती त्यानुसार ठरावात तशी दुरूस्ती करण्यात यावी.

श्री. सुर्यकांत जायभाये :विषय क्रमांक ४१३ रक्कम वळती करण्याच्या विषयात दुरुस्ती करण्यात यावी.

श्री. सुशील खेडकर : इतिवृत्तातील विषय क्रमांक ४०९ मध्ये जो निर्णय मा. महापौर यांनी दिला होता. त्याचा ठरावात उल्लेख करावा.

मा. महापौर :

१) स.स.श्री. विजेंद्र जाधव यांनी सुचना केली त्याप्रमाणे विषय क्र ३९९ हा स्थगित ठेवण्यात आला होता. तो दुरूस्तीसह या सभेमध्ये मंजुरी देण्यात येते.

२) स.स.श्री. गिरजाराम हाळनोर यांनी विषय क्र ४०८ अन्वये काही दुरूस्ती सुचविली होती. त्यांचे सुचनेवरून दूरूस्ती करण्यात यावी.

३) तसेच विषय क्र ४०९ मध्ये मागिल सभेमध्ये प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. परंतु उर्वरित जागेबाबत प्रशासनाने पाहणी करून अहवाल सादर करण्यास सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार पदाधिकारी यांचे चर्चेनुसार प्रस्तावातील उर्वरित २ एकर जागेबाबत १ एकर जागा दलित स्मशानभूमी व १ एकर जागा हिंदू स्मशानभुमीसाठी राखीव ठेवण्याच्या दूरुस्तीसह प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

४) त्याचप्रमाणे स.स.श्री.जायभाये सुर्यकांत यांनी सूचित केल्याप्रमाणे विषय क्रमांक ४१३ यामध्ये नविन लेखाशिर्ष दर्शविण्यात आलेले आहेत. त्या त बदल करून त्या ऐवजी सुधारित दिलेल्या लेखाशिर्षकानुसार दुरूस्तीसह मंजूर करण्यात येते.

५) प्रशासनातर्फे विषय क्र ४१४ मध्ये राष्ट्रीय शहर आरोग्य अभियान प्रकल्प अंमलबजावणी कृती आराखड्यामधील अनुदान नजरचुकीने ४३.३८ लक्ष रु. असे लिहीन्यात आलेले आहे. त्या ऐवजी रु. ४३ कोटी ३८ लक्ष असे वाचावे. अशी दुरूस्ती करण्यात येते.

उपरोक्त प्रमाणे ठरावातील दुरूस्तीसह विषय क्र ४३५ (विषय क्रमांक ३८० ते ४३४) ला मंजुरी देण्यात येते.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चे नुसार ----

१) दिनांक ३१.१२.२०१३ रोजीच्या इतिवृत्तातील विषय क्रमांक ३९९ मध्ये प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेने सिध्दार्थ उद्यानात नागरिक व लहान मुलांच्या मनोरंजनाकरीता अंदाजे ३५०० चौ.फुट जागा मे.डिझनी फन फेअर सिटी, नाशीक यांना भाडे तत्वावर स्वखर्चाने खेळणी बसविणे, देखभाल दुरुस्ती करणे, संकलन करणे इत्यादी करीता रक्कम रु.१२०००/- प्रति महा भाडे तत्वावर दिले. जे की ते भाडे अत्यंत कमी असून सदरील एजन्सीने महापालिकेचे दर लहान मुलांसाठी ५/- रु.व १०/-रु. प्रमाणे व सहलीसाठी येणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना महापालिकेतर्फे ५०% सुट देण्यात येते त्याप्रमाणे संबंधीत एजन्सीने दर आकारावे तसेच एजन्सीला दिलेल्या तारखेपासून रेडीरेकनर रेट

प्रमाणे फरकाची रक्कम वसुल करुन प्रति महा भाडे रक्कम रु.२११२५/- आकारण्यास मंजुरी देण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

२) दिनांक ३१.१२.२०१३ रोजीच्या इतिवृत्तातील पान क्र २१ वर ठराव क्रमांक ४०८ मध्ये अनुक्रमांक १ ते ८ मधील कामाची रक्कम रु. ६०.४० लक्ष वळती करून प्रभाग क्रमांक ८९ ज्योती नगर अंतर्गत सह्याद्री कॉर्नर ज्योती नगर ते दशमेश नगर नाल्यापर्यंत व्हाईट टॉप रोड बनविणे व रक्कम कमी पडल्यास महापालिकेच्या निधीतून खर्च करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच प्रताप नगर ब्रीजाची करावी लागणारी आवश्यक कामे शिल्लक रक्कमेतून करण्यास व हि रक्कम कमी पडल्यास मनपाच्या निधीतून खर्च करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

३) दिनांक ३१.१२.२०१३ रोजीच्या इतिवृत्तातील ठराव क्रमांक ४०९ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.९७ मध्ये राहुलनगर-सादातनगर भागात मुस्लीम कब्रस्तान व दलित स्मशान भुमीसाठी महानगरपालिकेने ४ एकर २० गुंठे जमीन संपादित केलेली असुन त्या जागेमधुन २ एकर २० गुंठे मुस्लीम समाजासाठी दफन विधी करण्यासाठी परवानगी देण्यास तसेच उर्वरित दोन एक्कर जागेबाबत एक एक्कर जागा दलीत स्मशान भुमी व एक एक्कर जागा हिंदु स्मशान भुमीसाठी राखीव ठेवण्याच्या दुरुस्तीसह मंजुरी देण्यात येते.

४) दिनांक ३१.१२.२०१३ रोजीच्या इतिवृत्तातील ठराव क्रमांक ४१३मध्ये दर्शविल्याप्रमाणे खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास व नियमाप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते.

**जुने लेखाशिर्ष**

पुंडलिकनगर येथील जलकुंभास संरक्षित भींत व वॉचमन रूम बांधणे - १७५०
सन २०१३-१४ वॉर्ड ई स्पील ११२ भांडवली कामे पाणीपुरवठा

**नविन लेखाशिर्ष**

१. वॉड क्र.१७ एन-९ फरशी मैदानाची संरक्षीत भींतीच्या दुरूस्तीसह इतर कामे करणे र.०५ लक्ष
२. वॉर्ड क्र.८३ पुंडलिक नगर येथील अंतर्गत विविध ठिकाणची मलनिसा:रण ड्रेनेज वाहिनीची दुरूस्ती करणे रू.०७.५० लक्ष
३. वॉर्ड क्र.८३ पुंडलिक नगर अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत कामे करणे रू.०५ लक्ष.

५) प्रशासनातर्फे विषय क्र ४१४ मध्ये राष्ट्रीय शहर आरोग्य अभियान प्रकल्प अंमलबजावणी कृती आराखड्यामील अनुदान नजरचुकीने ४३.३८ लक्ष रु. असे लिहीण्यात आलेले आहे. त्या ऐवजी रु. ४३ कोटी ३८ लक्ष असे वाचावे. अशी दुरूस्ती करण्यात येते.

या दुरूस्तीसह दिनांक १९.१२.२०१३ची तहकूब सभा व दिनांक ३१.१२.२०१३ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४३६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८७, उल्कानगरी परिसरात महानगरपालिकेच्या जागेवर भव्य असा संत श्रृष्टी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या साठी वास्तुविशारद यांचे नकाशे, संकल्प चित्रे व देखरेख या करीता दिड टक्का फीस ची तरतुद अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे. या कामासाठी वास्तुविशारद (पीएमसी) ची नियुक्ती

करणे अत्यावश्यक असल्याने संत श्रृष्टीच्या कामासाठी श्री.शरद किसनराव गवळी यांची वास्तुविशारद म्हणून महागनरपालिकेतर्फे नियुक्ती करण्यात यावी, करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक:- श्री.संजय चौधरी. अनुमोदक:- श्री.पंकज भारसाखळे.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८७, उल्कानगरी परिसरात महानगरपालिकेच्या जागेवर भव्य असा संत श्रृष्टी प्रकल्प उभारण्या करीता वास्तुविशारद यांचे नकाशे, संकल्प चित्रे व देखरेख या करीता दिड टक्का फीस ची तरतुद अंदाजपत्रकात असून (पीएमसी) ची नियुक्ती करणे अत्यावश्यक असल्याने श्री.शरद किसनराव गवळी यांची वास्तुविशारद म्हणून महागनरपालिकेतर्फे नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४३७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८६ इंदीरानगर येथील आकाश प्रल्हाद मोरे हा मुलगा दिनांक २५.०२.२०१२ रोजी पोहण्यासाठी गेला असता, त्याचा हर्सुल तलावात बुडून मृत्यु झाला. या संदर्भात त्याच्या आईस आर्थिक मदत करण्यासाठी दिनांक २०.०४.२०१२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.७०७ अन्वये सर्वानुमते मंजुर करण्यात आला होता. तथापी, त्या विषयामध्ये प्रत्यक्ष आर्थिक रक्कम किती करावी याची नोंद नाही.

करीता आकाश प्रल्हाद मोरे यांच्या आईस आर्थिक मदत म्हणून रक्कम रुपये ०२.०० लक्ष देण्याबाबतचा दुरूस्ती प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक:- श्री.सुशिल तुकाराम खेडकर. अनुमोदक:- श्री.नारायण कुचे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.८६ इंदीरानगर येथील आकाश प्रल्हाद मोरे हा मुलगा दिनांक २५.०२.२०१२ रोजी पोहण्यासाठी गेला असता, त्याचा हर्सुल तलावात बुडून मृत्यु झाला. दिनांक २०.०४.२०१२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.७०७ अन्वये प्रत्यक्ष आर्थिक रक्कम किती करावी याची नोंद त्या प्रस्तावात नसल्याने या प्रस्तावानुसार आकाश प्रल्हाद मोरे यांच्या आईस आर्थिक मदत म्हणून रक्कम रुपये ०२.०० लक्ष देण्यासाठी प्रशासनाने महापालिकेच्या नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४३८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्रात सर्वत्र गटाई कामगारांना महापालिकेच्या वतीने पिच लायसंन्स दिले गेले आहेत.

त्याचप्रमाणे औरंगाबाद मधील सर्व गटाई कामगारांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने पिच लायसन्स प्रदान करण्यात यावे त्यासाठी सदरील प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक:- श्रीमती सुनिता भारत बरथुने, श्रीमती छाया साईनाथ वेताळ

अनुमोदक:- श्री. नारायण कुचे, श्री. सुशिल तुकाराम खेडकर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेमधील सर्व गटाई कामगारांना महानगरपालिकेच्या वतीने पिच लायसन्स प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४३९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९९ शिवाजीनगर येथील विकास कामासाठी सन २०१३-१४ या अर्थ संकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन खालील कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवण्यात येवून कामा हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र | प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र.९९ शिवाजीनगर मधील सन २०१३-१४ अर्थसंकल्प नविन कॉन्क्रेट रस्ते या लेखा शिर्षकांतर्गत पान क्र.W/F Spill-१३१ अनुक्रमांक ७३ वर रक्कम रु.०५.०० लक्षची तरतुद करण्यात आली आहे. | वार्ड क्र.९९ शिवाजीनगर येथील C-L-६ मधील गल्ल्यात पूनर्डांबरीकरण करणे. |

सुचक:- श्रीमती छाया साईनाथ वेताळ. अनुमोदक:- श्री.सुशिल खेडकर.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.९९ शिवाजीनगर येथील विकास कामासाठी सन २०१३-१४ या अर्थ संकल्पात तरतुद ठेवुन खालील कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र.९९ शिवाजीनगर मधील सन २०१३-१४ अर्थसंकल्प नविन कॉन्क्रेट रस्ते या लेखा शिर्षकांतर्गत पान क्र.W/F Spill-१३१ अनुक्रमांक ७३ वर रक्कम रु.०५.०० लक्षची तरतुद करण्यात आली आहे. | वार्ड क्र.९९ शिवाजीनगर येथील C-L-६ मधील गल्ल्यात पूनर्डांबरीकरण करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४४०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१० जयसिंगपुरा येथील विकास कामासाठी सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आली असून खालील प्रस्तावित कामाऐवजी सुधारित कामासाठी तरतुद ठेवण्यात येवून काम हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र | प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|---|
| १. | वार्ड अ स्पील १२ अनु.क्र.३८ मध्ये अंतर्गत लक्ष्मी कॉलनी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. रु.०९.०० लक्ष. | वार्ड क्र.१० जयसिंगपुरा येथे विविध ठिकाणी ट्रिमीक्स कॉंकेटींग करणे. रु.०९.०० लक्ष. |
| २. | SCR,A-२ स्थायी समितीने शिफारस केलेल्या विविध विकास कामे. रु.१५.०० लक्ष. | जयसिंगपुरा भागातील श्री.कलीम अखतर साहेबांच्या गल्लीत डांबरीकरण करणे. रु.०७.०० लक्ष तसेच जयसिंगपुरा वार्डात विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. रु.०८.०० लक्ष. |
| ३. | GBR,A-२ वॉर्ड क्र.१० जयसिंगपुरा वॉर्डात विद्युवितकरण करणे. रु.०५.०० लक्ष. | जयसिंगपुरा वॉर्डात विविध ठिकाणी सिमेंट रस्ते बनविणे. रु.०५.०० लक्ष. |

सुचक:- श्री.अशोक किसनराव बेहडे. अनुमोदक:- श्री.अफसर खान यासीन खान.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१० जयसिंगपुरा येथील विकास कामासाठी सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पातील प्रस्तावित कामाऐवजी सुधारित कामासाठी तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|---|
| १. | वार्ड अ स्पील १२ अनु.क्र.३८ मध्ये अंतर्गत लक्ष्मी कॉलनी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. रु.०९.०० लक्ष. | वार्ड क्र.१० जयसिंगपुरा येथे विविध ठिकाणी ट्रिमीक्स कॉंकेटींग करणे. रु.०९.०० लक्ष. |
| २. | SCR,A-२ स्थायी समितीने शिफारस केलेल्या विविध विकास कामे. रु.१५.०० लक्ष. | जयसिंगपुरा भागातील श्री.कलीम अखतर साहेबांच्या गल्लीत डांबरीकरण करणे. रु.०७.०० लक्ष तसेच जयसिंगपुरा वार्डात विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. रु.०८.०० लक्ष. |
| ३. | GBR,A-२ वॉर्ड क्र.१० जयसिंगपुरा वॉर्डात विद्युवितकरण करणे. रु.०५.०० लक्ष. | जयसिंगपुरा वॉर्डात विविध ठिकाणी सिमेंट रस्ते बनविणे. रु.०५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हॉटेल वेदांत ते उस्मानपुरा या रस्त्याला "डॉ.पुरुषोत्तम भापकर" हे नाव देण्यात यावे, करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक:- श्री.मिर हिदायत अली, श्री.सुशिल तुकाराम खेडकर,श्री.गजानन बारवाल, श्री.रेणुकादास (राजु) वैद्य.

अनुमोदक:- श्री.प्रमोद राठोड, श्री.गाझी जुबेर, श्री.काशीनाथ कोकाटे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल वेदांत ते उस्मानपुरा या रस्त्याला "डॉ.पुरुषोत्तम भापकर" हे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाच्या सात कलमी कार्यक्रम योजनेअंतर्गत शहरातील घोषीत व अघोषीत झोपडपट्टीमध्ये शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे व सन २०२० पर्यंत झोपडपट्टी मुक्त शहराचे नियोजन करण्यासाठी शासनाने राजीव आवास योजना जाहिर केलेली आहे. या योजने अंतर्गत मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने झोपडपट्टी मुक्त शहराचे नियोजन करण्यात येणार आहे.

तसेच महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील लोकांसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन निर्णयानुसार अनुसूचिंत जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकूल योजना जाहीर करण्यात आली आहे. औरंगाबाद महानरगपालिकेतर्फे सद्यस्थितीत या दोन्ही योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून यासाठी शासनाकडून निधी सुध्दा प्राप्त झालेला आहे.

परंतु सदर योजना ही सद्यस्थितीमध्ये केवळ घोषीत स्लम वसाहतीमध्येच लागू करण्यात आलेली असून औरंगाबाद शहरामध्ये जवळपास ११७ गुंठेवारी वसाहती असून या गुंठेवारी वसाहतीमधील नागरीक या योजनेच्या लाभापासून वंचित असून अशा नागरीकांवर अन्याय होत आहे. शासन निर्णयामध्ये गुंठेवारी वसाहतीसांठी पीआर कार्ड/सातबाराची अट नमुद करण्यात

आलेली आहे. सदर अट शिथील करण्यात यावी. तसेच ज्या नागरीकांनी आपली मालमत्ता गुंठेवारी कायद्याअंतर्गत नियमीत केलेली आहे, अशा नागरीकांना या योजनेचा लाभ देण्यात यावा.

करीता उपरोक्त दोन्ही शासकीय योजना या गुंठेवारी वसाहतीमध्ये लागू करणेसाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :-श्री. संजय चौधरी, श्री. नारायण कुचे

अनुमोदक:- श्रीमती सविता सुरे, श्रीमती सावित्रीबाई वाणी

मा.महापौर :नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्र शासनाच्या सात कलमी कार्यक्रम योजनेअंतर्गत शहरातील घोषीत व अघोषीत झोपडपट्टीमध्ये शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे व सन २०२० पर्यंत झोपडपट्टी मुक्त शहराचे नियोजन करण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या राजीव आवास योजने अंतर्गत मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील लोकांसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन निर्णयानुसार अनुसूचिंत जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकूल योजना जाहीर करण्यात आल्यानुसार औरंगाबाद महानरगपालिकेतर्फे सद्यस्थितीत या दोन्ही शासकीय योजना या गुंठेवारी वसाहतीसांठी पीआर कार्ड/सातबाराची अट शिथील करुन लागू करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतील गुंठेवारी क्षेत्रातील प्रभाग क्र ८४ बाळकृष्ण नगर मधील अजिंक्य नगर व पहाडे कॉर्नर, भुषण नगर या वसाहती गुंठेवारी क्षेत्रात येत असून येथील वसाहतीमध्ये महानगरपालिकेच्या मुलभूत सोयी देखील पुरविलेल्या आहेत. परंतु या वसाहतीमधील काही भाग महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखड्यामध्ये आरक्षण क्र. २३९ (S.C.P.) २४० (P.S.) या आरक्षणाने बाधीत आहेत. परंतु या जागेवर १०० (%) घरे बांधून झालेली असल्याने महापालिकेस आरक्षण करीता जागा उपलब्ध होणार नाही. त्यामुळे सदर आरक्षण रद्द करून गुंठेवारी विकासामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने यापुर्वी अशा प्रकारचे आरक्षणही रद्द केले आहे.

करीता आरक्षण क्र २३९ (S.C.P.) २४० (P.S.) सर्व्हे न २०/२ मधील आरक्षण रद्द करून गुंठेवारी विकासात हा भाग समाविष्ट करावा व गुंठेवारी विकास अधिनियमानुसार येथील वसाहतीमध्ये मिळकती नियमाधीन कराव्यात करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्री. पंकज भारसाखळे

अनुमोदक :- श्रीमती उर्मिला नितीन चित्ते, श्री.अशोक किसनराव बेहडे.

श्री.पंकज भारसाखळे :अजिक्यनगर व पहाडे कॉर्नर मध्ये १०० टक्के घरे झाली तेथील नागरीक विकास कामाची मागणी करीत आहे.तेथे १०० टक्के मतदार आहेत मा.उच्च न्यायालयाचे सन २००८ चा एक निर्णय आलेला आहे त्यानुसार मा.न्यायालयाची परवानगी घेवून प्रशासनाने या बाबत कार्यवाही करावी.

| | |
|---|---|
| मा.महापौर | :गुंठेवारी संदर्भात मा.न्यायालयाचे काय निर्देश आहे त्यानुसार विधी विभागाने या बाबत मा.न्यायालयाची परवानगी घेवून योग्य ती कार्यवाही करावी. |
| श्री.संजय चौधरी | :गुंठेवारी विभागात संचिका मंजूर होत नाही कोणतीही कामे होत नाही असे असेल तर तो विभाग बंद करावा. |
| श्री.त्रिंबक तुपे | :गुंठेवारी विभागात ज्या पध्दतीने काम होते ते बरोबर नाही गुंठेवारीमध्ये ४३-४४ वार्ड येतात या भागात अडीच ते तीन लक्ष लोकसंख्या आहे गुंठेवारी भरण्या संदर्भात वेळोवेळी कॅम्प लावले स.वार्डाचे सदस्य यांनी गुंठेवारी भरण्यासाठी नागरीकांकडे पाठपुरावा केला नागरीक गुंठेवारी भरणा करीत असतांना या विभागाची अतिशय संथ गतीने काम चालू आहे.एजन्सीला काम दिले होते त्यांनी नागरीकाकडे जाऊन सर्वे करणार, नकाशे काढायचे आम्ही नागरीकाना गुंठेवारी भरणा करण्यास सांगत असे. परंतु १-२ वर्षापासून या ठिकाणी नागरीक येतात,चकरा मारतात, आजही त्या विभागात काम होत नाही.१०० टक्केतून ८० टक्के वसुली होते तर तेथे काम व्हावे. चिकलठाणा,भावसिंगपुरा, मिटमिटा, पुंडलिकनगर या भागात गुंठेवारीचे अनेक वार्ड झाले या भागात पाणी ,ड्रेनेज रस्त्याचे प्रश्न सोडविले जात नाही.प्रशासना समवेत स.पदाधिकारी यांची बैठक झाली जाचक अटी शिथिल करणार होतो त्याची अमलबजावणी झाली नाही. ज्याची संचिका त्यांना मिळत नाही चलन दिले जात नाही एक चलन भरणा केले तर दुस-यांदा नागरीक गेले तर तेथे कुणी हजर नसतात या विभागात जास्तीचे कर्मचारी देवून मा.आयुक्तांनी वैयक्तिक लक्ष दयावे जेणे करून गुंठेवारी भाग रेग्युलर होवून तेथे विकास कामे होतील. |
| श्री.संजय चौधरी | :गुंठेवारी भागात डी पी रोडची आताच मार्कींग करावी नागरीक रस्त्यात घरे बांधत आहे नंतर ते पाडणार का ? |
| श्री.नारायण कुचे | :ज्या भागात ८० टक्के गुंठेवारीच्या माध्यमातून पैसे भरणा झाले असेल अशा भागात १०० टक्के विकास व्हावा यापुर्वीचे मा.आयुक्त यांनी तसा निर्णय घेतलेला आहे शहरात ११७ वसाहती गुंठेवारीत येतात या सर्व भागात ही विकास होत नाही ही समस्या आहे महालक्ष्मी कॉलनीमध्ये १० लक्ष रूपये गुंठेवारीच्या माध्यमातून जमा झाले अशा ठिकाणी १२ लक्षच्या कामाचे अंदाजपत्रक होत असेल तर तेथे काम झाले पाहिजे. |
| मा.महापौर | :गुंठेवारी भागात ८० टक्के लोकांनी पैसे भरणा केले असेल तर तेथे विकास कामे करावी. |
| श्री.अफसर खान | :गुंठेवारी भागात १०० टक्के लोकांनी पैसे भरणा केले असेल तरच तेथे १०० टक्के कामे व्हावी. |

मा.महापौर :गुंठेवारी संदर्भात एक बैठक घेण्यात येईल यापुर्वी जो बैठकीत निर्णय घेतला आहे त्याची अमलबजावणी मा.आयुक्तानी करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील गुंठेवारी क्षेत्रातील प्रभाग क्र ८४ बाळकृष्ण नगर मधील अजिंक्य नगर व पहाडे कॉर्नर, भुषण नगर या वसाहती गुंठेवारी क्षेत्रात येत असून या जागेवर १०० (%) घरे बांधून झालेली असल्याने व येथे महापालिकेस आरक्षण करीता जागा उपलब्ध होणार नसल्याने आरक्षण क्र २३९ (S.C.P.) २४० (P.S.) सर्व्हे न २०/२ मधील आरक्षण रद्द करून गुंठेवारी विकासात हा भाग समाविष्ट करण्याकरीता प्रशासनाने विधी विभागामार्फत मा. न्यायालयाचे या संदर्भात दिलेले निर्देश लक्षात घेऊन नियमानुसार प्रस्तावातील वसाहती गुंठेवारी विकास अधिनियमानुसार येथील वसाहतीमध्ये मिळकती नियमाधीन करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रश्न क्र.१२१,१२२,१२३,**

श्री.त्रिंबक तुपे :वार्ड क्र.६६ मधील माझ्या वार्डातीलच विषय आहे.येथील नागरीकांनी वारंवार मागणी करून उत्तरे मिळाली नाही त्यामूळे मला प्रश्न दयावे लागले मला अदयाप प्रश्नाचा खुलासा मिळाला नाही याची आपण दखल घ्यावी.ज्यावेळेस लेआऊट मंजूर झाला त्या ठिकाणी ३५६४/८५ हा गट नं. तेथे आहे मला प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही.ही जागा मुळ मालकाने १९८५ ला मनपास हॅडओव्हर केली होती परंतु महापालिकेच्या नावावर केली नाही.करोडोची जागा त्यातील एक पार्ट ताब्यात घेतला. काही काळ काम थांबले त्या ठिकाणी कपाऊंड वॉल करून बोर्ड सुध्दा लावण्यात आला होता परंतु दुस-याच दिवशी रूणवाल नावाचे बिल्डर यांनी तो बोर्ड काढून जागेवर ते त्यांचा हक्क दाखवित होते.मुळ मालकाने महापालिकेकडे जागा दिली होती तर हस्तांतरण करून पी आर कार्डवर मनपाचे नाव का लावण्यात आले नाही तसेच विश्वभारती कॉलनी भागात ५ लेआऊट असून दोन जागेवर अतिक्रमण झाले जेष्ठ नागरीक आहे त्यांनी पैसे जमा करून वकील लावून जागा बिल्डरांच्या घशात जावू नये म्हणून प्रयत्न करतात.जे काम मनपाने करायला पाहिजे होते, ते काम तेथील रहिवासी करीत आहे. जी जागा ताब्यात आहे तेथे मुलासाठी खेळणी तसेच नागरीकासाठी सुविधा कराव्यात अशी मी मागणी केली कार्यवाही केली नाही असाच प्रकार होत राहिला तर शहरातील इतर सर्व मनपाच्या जागा महापालिकेच्या ताब्यातून जातील.१९८५ ला त्या जागेवर प्रशासनाने नाव लावून घेतले नाही. नीळ नावाचे व्यक्तीने त्या जागेवर त्यांचे नाव लावून घेतले. ती जागा मनपाच्या ताब्यातून गेली.महापालिका सांगते आपलीच आहे. परंतु त्या जागेवर रूणवाल नावाचे व्यक्तीने शेड तयार केले.नागरीकांना धमक्या येतात मध्ये येवू नये कोर्ट प्रकरण करू नये.ही परीस्थिती तेथे आहे.मुळ मालक पाटील म्हणून त्यांनी याचिका दाखल केली की, ही जागा मनपा

सांभाळू शकत नाही.नावावर करू शकत नाही. माझी मुळ जागा मला देण्यात यावी शहरातील सर्व मनपाच्या जागेचे सर्वेक्षण करावे.मनपाचे नाव त्या जागेला लावून घ्यावे. यापुर्वी आदेशीत केले होते त्यात ही जागा असेल परंतु करोडो रूपयाच्या जागा लोकांच्या घशात जात आहे. नागरीक सक्षम नसेल व लोकप्रति निधी यांना अशा प्रकणात हस्तक्षेप करावा लागत असेल, तर महापालिका प्रशासन काय काम करते. मी वारवांर निदर्शनास आणून देवून सुध्दा कार्यवाही झाली नाही. प्रश्न क्र.१२२ मधील जागा मनपाची आहे. त्यावरही अतिक्रमण झालेले आहे तीपण करोडो रूपयाची जागा आहे तसेच प्रश्न क्र.१२३मध्ये रविंद्रनगर येथील प्लॉट नं ०९ सोसायटीचा आहे त्या जागेवर एका व्यक्तीला बांधकाम परवानगी दिली या जागेच्या संदर्भात उप निबंधक व मा.विभागीय सह निबंधक यांचेकडे वाद चालू असतांना व सोसायटीची परवानगी घेतली नाही बांधकाम परवानगी कशी दिली. प्रकरणात निकाल लागल्यानंतर परवानगी दयायला पाहिजे होती.परंतु तसे झाले नाही.तेथील सोसायटीच्या सभासदाचे ऑब्जेक्शन आहे. या तीनही प्रश्नाच्या संदर्भात मी माहिती विचारली त्यात विशेषत:दोन मोठया जागा आहे मा.महापौर यांनी वेळ काढून सर्व स.पदाधिकारी मा.आयुक्त व संबधीत अधिकारी यांचे समवेत जागेची पाहणी करावी.तेथील नागरीक राहतील नागरीकाचे प्रश्न ऐकूण घेवून या बाबतीत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही वेळीच करावी.

मा.महापौर :आताच स.सदस्य श्री.त्रिंबक तुपे यांनी जो जागेच्या संदर्भात प्रश्न उास्थित केला त्या जागेवर १ आठवडयाच्या आत जावून पाहणी करून योग्य ती कार्यवाही प्रशासन करील.

श्री.अफसर खान :शहरात अनेक मनपाच्या जागा आहे मात्र पी आर कार्ड दुस-याचे नावाने,अशा सर्व जागा मनपाच्या नावे पीआर कार्डवर घेणेसाठी तहसिलदार दर्जाचे अधिकारी नेमणूक केली होती. कुठपर्यंत कार्यवाही आलेली आहे.

मा.महापौर :मनपाच्या मालकी असलेल्या जागा मनपाच्या ताब्यात घेणे करीता प्रशासनाने एक समिती नियुक्त करावी व महापौर दालनात समितीचे सदस्य व स.पदाधिकारी व वार्डातील संबधीत स.सदस्य यांची एक संयुक्त बैठक घेवून योग्य तो निर्णय घेणेत येईल.

श्री.रवि कावडे :माझे वार्डात दोन एकर जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता आहे तेथे तारकुपंन करावे.

श्री.मुजीब खान :शहरातील मनपाच्या मालकीच्या असलेल्या सर्व जागेचा सर्वे करावा असा निर्णय झाला होता. परंतु नगररचना विभागातील खालचे कर्मचारी निटनेटके काम करीत नाही. कर्मचा-याच्या घरी संचिका असतात १०-१२ वर्षापासून त्याच विभागात तेच कर्मचारी आहे कोणतेही काम तातडीने होत नाही.

| | |
|---|---|
| श्री.गिरजाराम हाळनोर | :मनपाच्या सर्व जागा नावावर करण्यासाठी एक एजन्सीला काम दिले होते काय कार्यवाही केली. |
| मा.महापौर | :समिती नियुक्ती करण्याचे आदेशीत केले आहे. समिती आपण एकत्र बसून योग्य तो निर्णय या बाबतीत घेतला जाईल. |

## पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्रमांक ४४४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७६ श्रीरामनगर येथील विकास कामासाठी सन २०१३-१४ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असून खालील प्रस्तावित कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवण्यात येवून काम हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| **मा.स्थायी समिती शिफारस**<br>अर्थसंकल्प पान क्र.SCRE-९ अ.क्र.०७ वर रक्कम रु.२०.०० लक्षची तरतुद करण्यात आली आहे. | १. वार्ड क्र.७६ श्रीरामनगर येथील भाजी मार्केटच्या नियोजीत खुल्या जागेला संरक्षण भिंत बांधणे. १२.०० लक्ष.<br>२. वार्ड क्र.७६ श्रीरामनगर येथे विविध ठिकाणी उर्जा बचत दिवे बसविणे. ०५.०० लक्ष.<br>३. वार्ड क्र.७६ श्रीरामनगर येथील श्रीरामशाळेजवळील नाल्यास रिटेनिंग वॉल बांधणे.०३.०० लक्ष. |

सुचकः- श्रीमती कौशल्याबाई बन्सीलाल गांगवे. अनुमोदकः- श्री.सुर्यकांत जायभाये.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.७६ श्रीरामनगर येथील विकास कामासाठी सन २०१३-१४ या अर्थसंकल्पात तरतुद खालील सुधारित कामासाठी वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| **मा.स्थायी समिती शिफारस**<br>अर्थसंकल्प पान क्र.SCRE-९ अ.क्र.०७ वर रक्कम रु.२०.०० लक्षची तरतुद करण्यात आली आहे. | १. वार्ड क्र.७६ श्रीरामनगर येथील भाजी मार्केटच्या नियोजीत खुल्या जागेला संरक्षण भिंत बांधणे. १२.०० लक्ष.<br>२. वार्ड क्र.७६ श्रीरामनगर येथे विविध ठिकाणी उर्जा बचत दिवे बसविणे. ०५.०० लक्ष.<br>३. वार्ड क्र.७६ श्रीरामनगर येथील श्रीरामशाळेजवळील नाल्यास रिटेनिंग वॉल बांधणे.०३.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महिला व बाल कल्याण समितीच्या वतीने व मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेल्या मुलींचा जन्मदर वाढावा, स्त्री भ्रुण हत्येला आळा बसावा व महानगरपालिकेतील वैद्यकीय सेवेचा लाभ घेण्यासाठी तसेच जन्माला आलेल्या मुलीच्या भविष्यासाठी व तिच्या आर्थिक संरक्षणाच्या दृष्टिने राबविण्यात येणाऱ्या महानगरपालिकेच्या दवाखान्यामध्ये जन्माला येणाऱ्या मुलींसाठी मुदत ठेव योजनेला स्वर्गीय सौ.मिनाताई ठाकरे यांचे महिलांसाठीचे भरीव कार्य लक्षात घेता स्वर्गीय सौ.मिनाताई ठाकरे कन्या सुरक्षा मुदत ठेव योजना असे नामकरण करण्यात यावे.

करीता, मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्रीमती प्राजक्ता मंगेश भाले

अनुमोदक :- श्रीमती कौशल्याबाई गांगवे, श्री. मनिष चंद्रकांत दहिहंडे, श्री. विरभद्र रामलिंग गादगे.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या दवाखान्यामध्ये जन्माला येणाऱ्या मुलींसाठी मुदत ठेव योजनेला स्वर्गीय सौ.मिनाताई ठाकरे कन्या सुरक्षा मुदत ठेव योजना असे नामकरण करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र. १२ जयभिमनगर टाऊन हॉल येथील रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत झालेल्या ओ बी सी, व मुस्लीम समाजातील कुटुंबीयांना भविष्यात सुरू होणाऱ्या राजीव आवास योजनेत समाविष्ट करुन त्यांना राजीव आवास योजनेचा लाभ देण्यात यावा.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्रीमती ज्योती रमेश खिल्लारे

अनुमोदक :- डॉ. खान जफर अहेमद खान, श्री, मिलींद दाभाडे

मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.१२ जयभिमनगर टाऊन हॉल येथील रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत झालेल्या ओ बी सी, व मुस्लीम समाजातील कुटुंबीयांना भविष्यात सुरू होणाऱ्या राजीव आवास योजनेत समाविष्ट करुन त्यांना राजीव आवास योजनेचा लाभ देण्यासाठी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१३-२०१४ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणेबाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

| अ क्र | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | स २०१३-२०१४ च्या अर्थसंकल्पात वॉर्ड-ड जी बी आर बी-५ वरील प्रभाग क्र २३ मसनतपुर चिकलठाणा अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे.<br>र.रु. १०.०० लक्ष | १. प्रभाग क्र १८ पवननगर अंतर्गत एन-९, एम-२ संत ज्ञानेश्वर नगर मध्ये १५० एम एम डी आय जलवाहिनी टाकणे.<br>र.रु. ०२.०० लक्ष. |

सुचक :- श्री. संजय चौधरी अनुमोदक :- श्रीमती उर्मिला नितिन चित्ते.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०१३-२०१४ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे करीता लेखाशिर्ष बदल नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ क्र | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | स २०१३-२०१४ च्या अर्थसंकल्पात वॉर्ड-ड जी बी आर बी-५ वरील प्रभाग क्र २३ मसनतपुर चिकलठाणा अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण | १. प्रभाग क्र १८ पवननगर अंतर्गत एन-९, एम-२ संत ज्ञानेश्वर नगर मध्ये १५० एम एम डी आय |

| | | |
|---|---|---|
| | करणे.<br>र.रु. १०.०० लक्ष | जलवाहिनी टाकणे.<br>र.रु. ०२.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र ५४ संजयनगर या भागामध्ये गंजे शहीदा कब्रस्तान आहे. हि जागा कब्रस्तान म्हणून सार्वजनिक वापरासाठी वापरण्यात येत आहे. कब्रस्तांनाची बहुतांश जागा खाजगी मालकीची आज ही आहे. या ठिकाणी मात्र कब्रस्तान असल्याने संबंधीत जमीन मालक त्याचा वापर स्वत:साठी करु शकत नाही. या ठिकाणी कब्रस्तानाच्या जागेस संरक्षण भिंतीचे काम सुध्दा करण्यात आलेले आहे. कब्रस्तान वापर सुरू करण्यापुर्वी संपुर्ण कब्रस्तानाची जागा रितसर भुसंपादित करणे आवश्यक होते. मात्र जमीन मालकांना (भुखंड धारकांना) कोणता ही मोबादला न देता या जागेवर संरक्षण भिंत बांधून महानगरपालिकेने कब्रस्तान म्हणून त्याचा वापर सुरू केलेला आहे. नैसर्गिक न्यायाने या ठिकाणी ज्या भुखंडधारकांची मालकी आहे. त्यांना त्याच्या जागेचा रितसर मोबादला द्यावा लागेल.

करीता, संबंधीत भुखंडधारकांना नियमानुसार त्याचे जागेचा मोबादला (रोख/टिडिआर/एफएसआय) अदा करण्यासाठी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :- डॉ. खान जफर अहेमद

अनुमोदक :- श्री. अफसर खान, श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर, श्री. शेख अब्दुल असद, श्री. अशोक किसनराव बेहडे.

मा. महापौर : प्रशासनाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र ५४ संजयनगर या भागामध्ये गंजे शहीदा कब्रस्तान हि जागा कब्रस्तान म्हणून सार्वजनिक वापरासाठी वापरण्यात येत असून कब्रस्तांनाची बहुतांश जागा खाजगी मालकीची असल्याने नैसर्गिक न्यायाने या ठिकाणी ज्या भुखंडधारकांची मालकी आहे. त्यांना त्याच्या जागेचा रितसर मोबादला (रोख/टिडिआर/एफएसआय) अदा करण्यासाठी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्रमांक ४४९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र ५४ मधील रहिवाश्यांच्या सुविधेसाठी खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्र व अ.क्र. | २०१३-२०१४ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| पान क्र ५४ वॉर्ड-सी स्पील अ.क्र. १९,२०,२१ | १९. वॉर्ड क्र ५४ संजयनगर अंतर्गत गल्ली क्र. बी-१४ व बी-१५ येथील ०५ फुटाच्या गल्लीत मलबा,माती उचलुन ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणे.<br>आर्थिक तरतुद ०२ लक्ष रुपये.<br>२०.वॉर्ड क्र ५४ संजयनगर अंतर्गत गल्ली क्र बी-०८व बी-०९ येथील ०५ फुटाच्या गल्लीत मलबा, माती उचलुन, ड्रेनेज लाईन अप्रुटींग करुन पेव्हर ब्लॉक बसविणे. | १. वॉर्ड क्र ५४ संजयनगर येथील सामाजिक सभागृहाचे विविध कामे करणे.<br>कामासाठी रुपये ०६ लक्ष रुपये वळती करणे. |

| | | |
|---|---|---|
| | आर्थिक तरतुद ०२.०० लक्ष रुपये.<br>२१. वार्ड क्र.५४ संजयनगर स्लम अंतर्गत गल्ली क्रं.बी-६ व बी-७ मधील जुनी ३०० मि.मि. ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे.<br>आर्थिक तरतुद ०२ लक्ष रुपये. | |

सुचक :- डॉ खान जफर अहेमद

अनुमोदक :- श्री. शेख अब्दुल असद, श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र ५४ मधील रहिवाश्यांच्या सुविधेसाठी खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र व अ.क्र. | २०१३-२०१४ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| पान क्र ५४ वॉर्ड-सी स्पील अ.क्र. १९,२०,२१ | १९. वॉर्ड क्र ५४ संजयनगर अंतर्गत गल्ली क्र. बी-१४ व बी-१५ येथील ०५ फुटाच्या गल्लीत मलबा,माती उचलुन ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणे.<br>आर्थिक तरतुद ०२ लक्ष रुपये.<br>२०.वॉर्ड क्र ५४ संजयनगर अंतर्गत गल्ली क्र बी-०८व बी-०९ येथील ०५ फुटाच्या गल्लीत मलबा, माती उचलुन, ड्रेनेज लाईन अप्रुटींग करुन पेव्हर ब्लॉक बसविणे.<br>आर्थिक तरतुद ०२.०० लक्ष रुपये.<br>२१. वार्ड क्र.५४ संजयनगर स्लम अंतर्गत गल्ली क्रं.बी-६ व बी-७ मधील जुनी ३०० मि.मि. ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे.<br>आर्थिक तरतुद ०२ लक्ष रुपये. | १. वॉर्ड क्र ५४ संजयनगर येथील सामाजिक सभागृहाचे विविध कामे करणे.<br><br>कामासाठी रुपये ०६ लक्ष रुपये वळती करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४५०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या आस्थापनेवर १९९७-९८ पासून दोन कर्मचारी दैनिक वेतनावर प्रयोगशाळा सहाय्यक म्हणुन कार्यरत आहे. परंतु महानगरपालिकेच्या आस्थापनेवर प्रयोगशाळा सहाय्यक हि पदे मंजुर नसल्यामुळे सदरहू कर्मचाऱ्यांना आता पर्यंत सेवेत कायम करता आले नाही. त्यांची दैनिक वेतनावरील सेवा जवळपास १५ ते १६ वर्ष झाली असून अद्यापी ते दैनिक वेतनावर कार्यरत आहे. त्यांना कायम स्वरुपी सेवेचा फायदा मिळावा म्हणून महानगरपालिकेच्या आस्थापनेवर दोन प्रयोगशाळा सहाय्यकाची पदे वेतन श्रेणी रुपये ५२००/- ते २०२००/- ग्रेड पे १९००/- या वेतन श्रेणीत निर्माण करण्याचा प्रस्ताव तसेच मनपाच्या आस्थापनेवर आरोग्य विभागात सहाय्यक नेत्र अधिकारीचे पाच पदांची शासन मान्यतेसाठी प्रस्ताव मंजुर करुन नियमाप्रमाणे वेतनश्रेणीत पद निर्माण करण्यास व रोष्टर प्रमाणे भरण्यास प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

सुचक:- श्री.सुशिल खेडकर. अनुमोदक:- डॉ. जफर खान

मा. महापौर : प्रशासनाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दैनिक वेतनावर प्रयोगशाळा सहाय्यक पदावर कार्यरत असलेले दोन कर्मचारी यांना कायम स्वरुपी सेवेचा फायदा मिळावा म्हणून महानगरपालिकेच्या आस्थापनेवर दोन प्रयोगशाळा सहाय्यकाची पदे वेतन श्रेणी रुपये ५२००/- ते २०२००/- ग्रेड पे १९००/- या वेतन श्रेणीत निर्माण करण्याचा प्रस्ताव तसेच मनपाच्या आस्थापनेवर आरोग्य विभागात सहाय्यक नेत्र अधिकारीचे पाच पदांची शासन मान्यतेसाठी प्रस्ताव मंजुर करुन नियमाप्रमाणे वेतनश्रेणीत पद निर्माण करण्यास व रोष्टर प्रमाणे भरण्यास तसेच या बाबत प्रशासनाने महापालिकेच्या नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका गुंठेवारी क्षेत्रातील प्रभाग क्र.६७, उत्तम नगर ही वसाहत गुंठेवारी क्षेत्रात येत असून येथील वसाहतीमध्ये महानगरपालिकेने मुलभूत सुविधा देखिल पुरविल्या आहेत. परंतु या वसाहतीतील काही भाग महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखडयामध्ये आरक्षण क्र.२२८ (P.S) आरक्षणाने बाधित आहे. परंतु या जागेवर १००% बांधकाम झालेले असल्याने महानगरपालिकेस आरक्षणा करीता जागा उपलब्ध होणार नाही. त्यामुळे सदर आरक्षण रद्द करुन गुंठेवारी विकासामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने यापुर्वी अशा प्रकारची आरक्षण रद्द केलेली आहेत.

करीता, आरक्षण क्र. २२८ (P.S) सर्व्हे नं.१३/२ सि.स.नं.१५१८४/पैकी मधील आरक्षण रद्द करुन गुंठेवारी विकासात हा भाग समाविष्ट करावा व गुंठेवारी विकास अधिनियमानुसार येथील वसाहतीमधील मिळकती नियमाधिन कराव्यात.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचकः- श्रीमती शोभा पुखराज काळे. अनुमोदकः- श्री.सुरेंद्र कुलकर्णी

श्री.सुशिल खेडकर :यापूर्वीच्या गुंठेवारी नियमीत करण्यासाठीचा प्रस्तावावर जो निर्णय घेतला त्यानुसार या विषयात देखिल विधी सल्लागार यांचा सल्ला घेवून प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी्

मा.महापौर :विधी विभागाचा सल्ला घेवून प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका गुंठेवारी क्षेत्रातील प्रभाग क्र.६७, उत्तम नगर या जागेवर १००% बांधकाम झालेले असल्याने महानगरपालिकेस आरक्षणा करीता जागा उपलब्ध होणार नसल्याने आरक्षण क्र. २२८ (P.S) सर्व्हे नं.१३/२ सि.स.नं.१५१८४/पैकी मधील आरक्षण रद्द करुन गुंठेवारी विकासात हा भाग समाविष्ट करण्याकरीता प्रशासनाने विधी विभागामार्फत मा. न्यायालयाचे या संदर्भात दिलेले निर्देश लक्षात घेऊन नियमानुसार प्रस्तावातील वसाहती गुंठेवारी विकास अधिनियमानुसार येथील वसाहतीमध्ये मिळकती नियमाधीन करण्यास मंजुरी देण्यता येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड १९ येथील विकास कामासाठी सन २०१३-२०१४ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असून खालील प्रस्तावित कामाऐवजी सुधारित कामासाठी तरतुद ठेवण्यात येवुन काम हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| ०१. अर्थसंकल्प पान क्र एससीआरब/३ नविन काम अ क्र ८ वर वॉर्ड क्र १९ वॉर्ड ब अंतर्गत बी/२ निवीदा पध्दतीनुसार पुर्नडांबरीकरण करणे तरतुद रक्कम रु. २० लक्ष<br>०२. अथसंकल्प पान क्र जीबीआर-बी/६ अनु. क्र २ वॉर्ड क्र १९ अंतर्गत विविध ठिकाणी उर्जा बचत दिवे लावणे. तरतुद रक्कम रु. ०५ लक्ष<br>०३. अर्थसंकल्प पान क्र जीबीआर-बी/६ अनु क्र २ वॉर्ड क्र १९ शिवनेरी कॉलनी, म्हाडा कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे तरतुद रक्कम रु. १० लक्ष | प्रस्तावित ३५ लक्षचे विकास काम करण्यासाठी तरतुद ठेवण्यात आलेली आहे. त्या ऐवजी सदरील रक्कम वॉर्ड क्र १९ अंतर्गत विविध विकास काम करणे या साठी वळती करण्यात यावी. |

सुचक :- श्री. अनिल जुगललाल जैस्वाल अनुमोदक :- श्री. अमित भुईगळ

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड ९९ येथील विकास कामासाठी सन २०१३-२०१४ या अर्थसंकल्पात ठेवण्यात आलेली तरतुद खालील प्रस्तावित कामाऐवजी सुधारित कामासाठी लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| ०१. अर्थसंकल्प पान क्र एससीआरब/३ नविन काम अ क्र ८ वर वॉर्ड क्र १९ वॉर्ड ब अंतर्गत बी/२ निवीदा पध्दतीनुसार पुर्नडांबरीकरण करणे तरतुद रक्कम रु. २० लक्ष<br>०२. अथसंकल्प पान क्र जीबीआर-बी/६ अनु. क्र २ वॉर्ड क्र १९ अंतर्गत विविध ठिकाणी उर्जा बचत दिवे लावणे. तरतुद रक्कम रु. ०५ लक्ष<br>०३. अर्थसंकल्प पान क्र जीबीआर-बी/६ अनु क्र २ वॉर्ड क्र १९ शिवनेरी कॉलनी, म्हाडा कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे तरतुद रक्कम रु. १० लक्ष | प्रस्तावित ३५ लक्षचे विकास काम करण्यासाठी तरतुद ठेवण्यात आलेली आहे. त्या ऐवजी सदरील रक्कम वॉर्ड क्र १९ अंतर्गत विविध विकास काम करणे या साठी वळती करण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १३.०१.२०१४ रोजी मनपाचे कचरा उचलण्याचे टिप्पर वाहन एम एच २० सीटी ५४८४ या वाहनाने गणेश कॉलनी येथे धडक दिल्याने शेख अतीक शेख बशीर तांबोली राहणार हर्षनगर औरंगाबाद हे मयत झालेले असून मयतास ०४ मुले/मुली असून घरातील कर्ता माणुस गेल्याने संबंधीताचा संसार उघड्यावर आलेला आहे.

मयत शेख अतीक शेख बशीर तांबोली हे गरीब होते. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियास रक्कम रुपये ०५ लक्षाची आर्थिक मदत करण्यासाठी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्री. अब्दुल रऊफ खान (खलील खान)

अनुमोदक :- श्री. मिर हिदायत अली, श्रीमती जरीना मोहम्मद जावेद, श्री. काशीनाथ कोकाटे

मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाचे कचरा उचलण्याचे टिप्पर वाहन एम एच २० सीटी ५४८४ या वाहनाने धडक दिल्याने शेख अतीक शेख बशीर तांबोली मृत्यु झाल्याने त्यांच्या कुटुंबियास रक्कम रुपये ०५ लक्षाची आर्थिक मदत करण्यासाठी प्रशासनाने महापालिकेच्या नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

मा.महापौर :प्रशासनाकडून ऐनवेळी विषय आलेले आहे ते विषय तसेच स.सदस्यानी लेखाशिर्ष बदलण्याचे विषय आहे ते मंजूर.

**<u>विषय क्रमांक ४५४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद मनपामार्फत पडेगांव येथे कत्तलखान्यासाठी राखीव ३६ एकर जागेवर सन १९८६ पासून जनावरांसाठी कत्तलखाना कार्यरत आहे. कत्तलखान्यावर सुविधा पुरविण्यासाठी परवानाधारक मांसविक्री व्यावसायीकांची मागणी होती. केंद्र शासनाच्या खाद्यान्न उद्योग मंत्रालयामार्फत ११ व्या वित्त आयोगामध्ये कत्तलखाने आधुनिकीकरणासाठी प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के अनुदानावर (अर्थसहायाची कमाल मर्यादा १५ कोटी रु.) योजना लागु करण्यात आली आहे. त्यानुसार औरंगाबाद मनपा मार्फत कत्तलखाना आधिनिकीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या खाद्यान्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाकडे दिनांक २६/०४/२०११ रोजी सादर करण्यात आलेला होता.

औरंगाबाद मनपामार्फत राज्य शासनाच्या शिफारशीने खाद्यान्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास सादर केलेल्या प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) म्हणून केंद्र शासनाचे मान्यता प्राप्त संस्था 'मिटकॉन'- पुणे या संस्थेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल (D.P.R.) तयार करुन घेण्यात आला आहे. सदरच्या प्रकल्पास मा.सचिव, खाद्यान्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, नवि दिल्ली यांचे अध्यक्षतेखालील मंजुरी समितीच्या दि.१८/१२/२०१३ चे बैठकीत तत्त्वत: मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. व त्याबाबतचे दिनांक-२ जानेवारी-२०१४ चे मंजुरीपत्र पुढील कार्यवाहीसाठी मनपास प्राप्त झाले आहे.

**<u>प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे:-</u>**

मनपाच्या कत्तलखाना पडेगाव येथील गट नं.६६,६७ मध्ये कत्तलखान्यासाठी आरक्षित असलेल्या ३६ एकर जागेवर सन १९८६ पासुन कार्यरत असुन सध्या प्रकल्प पारंपारिक पध्दतीने चालवण्यात येतो. प्रकल्पाची क्षमता कमी असल्याने व त्या ठिकाणचे बांधकाम जुने-जीर्ण झाल्याने सदर कत्तलखाण्याच्या जागेवर केंद्र शासनाच्या खाद्यान्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाचे कत्तलखाने आधुनिकीकरण योजनेतुन प्रकल्प क्षमता वाढवून एकूण ३६४९.२६ लक्ष रुपयाचा कत्तलखाना आधुनिकीकरणाचा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे.

सदरचा प्रकल्प PPP (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) या तत्वावर केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार घेण्यात येत असुन एकुण ३६४९.२६ लक्ष रु.प्रकल्प खर्चामध्ये शासनाच्या खाद्यान्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाचे अर्थसहाय्य १४२४.७२ लक्ष.रु. प्राप्त होणार आहे. या प्रकल्पामध्ये PPP (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) पध्दतीने इच्छुक गुंतवणूकरदार व्यावसायीकास रक्कम- २२२४.५४ लक्ष रु.स्वत:चा हिस्सा घालावा लागणार आहे.

पडेगाव येथील सदर प्रकल्पाची जमिन,वीज,पुरवठा, पाणीपुरवठा, रस्ते, उपलब्ध इमारत व उपलब्ध साधन सामुग्री या माध्यमातून मनपाचा हिस्सा राहणार आहे.

सदर प्रकल्पातून मांस विक्री व्यावसायावर अवलंबुन असणाऱ्या कुटुंबाना व्यावसायासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध होणार असुन कत्तलखाना मजुर, कामगारांसाठी मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे. आधुनिक कत्तलखाण्यामधुन प्रक्रिया केलेले शुध्द, ताजे व निर्जुंतक मांस विक्रीसाठी शहरात ०६ ठिकाणी वार्ड निहाय उपलब्ध जागेनुसार मटन मार्केटस प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. मासांची शित साखळी ठेवण्यासाठी व मांस वाहतुकीसाठी ०२ एअरकुल्ड रेफर व्हॅन्स प्रकल्पामध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत.

शहाबाजार येथील शेळ्या, मेंढयांचा कत्तालखाना शहराच्या मध्यवस्तीत असुन विमानतळापासून १० कि.मी. अंतराच्या बाहेर चालवणे नियमानुसार आवश्यक असल्याने सदरचा शेळ्या, मेंढयांचा कत्तलखाना क्षमता वाढ व आधुनिकीकरण करुन पडेगाव येथे स्थलांतरीत करण्यात येणार आहे. मांसविक्री व्यावसायीकानां कत्तलीसाठीची जनावरे, शेळ्या, मेंढया खरेदी-विक्रीसाठी जनावराच्या बाजाराचे कत्तलखाना परिसरात नियोजन करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी PPP (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) तत्त्वावर योजना राबवणेसाठी केंद्र शासनामार्फत मिटकॉन, ही प्रकल्प परिक्षण संस्था (P.M.A.) म्हणून नियुक्त केली असुन मनपामार्फत अनुभवी व तज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्था (P.M.C.) नियुक्त करावी लागणार आहे. या संस्थांच्या मदतीने राज्य व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार ई-टेंडरिंगद्वारे इच्छुक गुंतवणुकदार अशा सक्षम पात्र व अनुभवी संस्थाकडुन RFQ (रिक्वेस्ट फॉर कॉलीफिकेशन) तांत्रिक कार्यक्षमता प्रस्ताव मागवावे लागणार आहेत. पात्र झालेल्या संस्थामधुन ई-टेंडरिंगच्या माध्यमातून RFP (रिक्वेस्ट फॉर प्रपोजल) प्रकल्प प्रस्ताव निविदा मागवुन पात्र संस्थेची निवड करावी लागणार आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी PPP (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) एजन्सी निश्चित झाल्याचे खाद्यान्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास कळवावे लागणार आहे. त्यानंतर केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रकल्प उभारणीसाठी निधी उपलब्धते बाबत कार्यवाही करावी लागणार आहे.

औरंगाबाद मनपाच्या कत्तलखाना आधुनिकीकरण प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत वरिल प्रक्रिया पुर्ण करणेसाठी मा.आयुक्तांना अधिकार प्रदान करणेसाठी सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर चर्चेअंती मान्यतेस्तव सादर करण्यात येतो.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व नमुद केलेली ठळक वैशिष्ट्ये यानूसार मनपाच्या कत्तलखाना आधुनिकीकरण प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी PPP (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) तत्त्वावर योजना राबवणेसाठी केंद्र शासनामार्फत मिटकॉन, ही प्रकल्प परिक्षण संस्था (P.M.A.) म्हणून नियुक्त केली असुन मनपामार्फत अनुभवी व तज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्था (P.M.C.) नियुक्त करावी लागणार असल्याने या संस्थांच्या मदतीने राज्य व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार ई-टेंडरिंगद्वारे इच्छुक गुंतवणुकदार अशा सक्षम पात्र व अनुभवी संस्थाकडुन RFQ (रिक्वेस्ट फॉर कॉलीफिकेशन) तांत्रिक कार्यक्षमता प्रस्ताव मागवावे लागणार असून पात्र झालेल्या संस्थामधुन ई-टेंडरिंगच्या माध्यमातून RFP (रिक्वेस्ट फॉर प्रपोजल) प्रकल्प प्रस्ताव निविदा मागवुन पात्र संस्थेची निवड करावी लागणार असून प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी PPP (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) एजन्सी निश्चित झाल्याचे खाद्यान्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास कळवून त्यानंतर केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रकल्प उभारणीसाठी निधी उपलब्धते बाबत कार्यवाही करून प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत

वरिल प्रक्रिया पुर्ण करणेसाठी मा.आयुक्तांना अधिकार प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक करणे.

**विषय क्रमांक ४५५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील महत्वांच्या ऐतिहासीक स्थळांसाठी पर्यटनाच्या दृष्टीने सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने औरंगाबाद पर्यटन मेगा सर्किटचा प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला होता. या प्रस्तावास दिनांक ३१.०३.२०१३ या केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या आदेशानुसार औरंगाबाद मेगा सर्किटचा प्रस्ताव रक्कम रुपये २३४३.२० लक्ष मंजुरी प्राप्त झालेली असुन या प्रस्तावा अंतर्गत मंजुर प्राप्त कामांपैकी महानगरपालिकेशी संबंधित खालील तीन कामांसाठी निधी महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

**१) टुरीस्ट टॅक्सी स्टँड विकसीत करणे बाबत:-**

एमटीडीसी विश्रामगृह, रेल्वे स्टेशन येथे टुरीस्ट स्टँड विकसीत करणेसाठी रक्कम रुपये ५७.०२ लक्ष एवढा निधी मंजुर झालेला आहे. या अंतर्गत सार्वजनिक शौचालय, वाहनतळ, सुरक्षा रक्षक कॅबीन इत्यादी तयार करण्यात येणार आहे.

**२) रस्त्यांचे सुशोभीकरण करणे:-**

औरंगाबाद शहरातील पर्यटन स्थळांकडे जाणारे रस्ते सुशोभिकरण करणेसाठी रक्कम रुपये ४२०.५१ एवढा निधी मंजुर झालेला आहे. या अंतर्गत दिशादर्शक फलक, विविध चौकांमध्ये बेट (Island), सुशोभिकरण, लँडस्केपींग, दुभाजक इत्यादी तयार करण्यात येणार आहे.

**३) मजनुहील येथे रोज़ गार्डन विकसीत करणे:-**

मजनुहील येथे रोज़ गार्डन विकसीत करणेसाठी रक्कम रुपये ३५५.७१ लक्ष एवढा निधी मंजुर झालेला आहे. या अंतर्गत लँडस्केपींग, लॉन सुशोभीकरण व लायटींग, दिशादर्शक फलक, कुंपन भिंत, विद्युतीकरण, पाण्याचे कारंजे, लहान मुलांसाठी पार्क (ज्यामध्ये बेंजेस, खेळणी, कचरा पेटी), शौचालय, पाथवे, वाहनतळ, पाणी पुरवठा व वितरण, पावसाच्या पाण्याच्या निचरा करणेसाठी गटार बांधणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

उपरोक्त दर्शविल्यानुसार औरंगाबाद पर्यटन मेगा सर्किट अंतर्गत विविध पर्यटन स्थळांचा विकास करणेसाठी महानगरपालिकेशी संबंधीत तीन प्रस्तावित कामांचा एकत्रित निधी रक्कम रुपये ८३३.२४ लक्ष एवढा निधी मंजुर झालेला आहे. सदर निधी हा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडुन औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

करिता उपरोक्त दर्शविलेल्या कामा अंतर्गत प्रस्तावित कामांसाठी अंदाजपत्रके तयार करणे, प्रकल्पांचे नकाशे तयार करणे तसेच निविदा कार्यवाही करणेसाठी परवानगी मिळणे आणि सदर योजनेचा प्रकल्प आराखडा तयार करणे, प्रत्यक्ष कामावर देखरेख ठेवणेसाठी एकूण प्रकल्प किंमतीच्या २% या दराने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) नियुक्त करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील महत्वांच्या ऐतिहासीक स्थळांसाठी पर्यटनाच्या दृष्टीने सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने औरंगाबाद पर्यटन मेगा सर्किटचा प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे दिलेल्या प्रस्तावा अंतर्गत मंजुर प्राप्त कामांपैकी महानगरपालिकेशी संबंधित १) टुरीस्ट टॅक्सी

स्टँड विकसीत करणे बाबत २) रस्त्यांचे सुशोभीकरण करणे ३) मजनुहील येथे रोज़ गार्डन विकसीत करणे या कामा अंतर्गत प्रस्तावित कामांसाठी अंदाजपत्रके तयार करणे, प्रकल्पांचे नकाशे तयार करणे तसेच निविदा कार्यवाही करणेसाठी परवानगी मिळणे आणि सदर योजनेचा प्रकल्प आराखडा तयार करणे, प्रत्यक्ष कामावर देखरेख ठेवणेसाठी एकूण प्रकल्प किंमतीच्या २% या दराने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) नियुक्त करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४५६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभागा कडील शासन निर्णय क्रमांक/टिपीएस-३००६/३२१/प्र.क्रं/२३९/२००६/नवि ३० दिनांक २२ सप्टेंबर २००६ अन्वये सिडको भागातील सर्व पायाभुत सुविधां तसेच सेवांचे हस्तांतरण महानगरपालिके कडे रितसर करारनामा अंती देखभाल व दुरुस्ती व इतर बाबींवर खर्च करणे करीता करण्यात आलेले आहे.

औरंगाबाद शहराच्या सभोवतालचा विकास होण्याच्या दृष्टीकोनातुन सिडकोने महत्वाची भुमिका निभावलेली असुन सिडकोने तयार केलेल्या वसाहती मध्ये सर्वसमावेशक निवासी व वाणिज्य सकुंले तयार केलेली आहे.

सिडकोने या भागातील शैक्षणिक/सामाजिक संस्थेसाठी जागांचा विकास करतांना परीसरातील मुलांचा सर्वांगीन विकास होण्याच्या दृष्टीकोनातुन प्रत्येक सेक्टर मध्ये खेळासाठी मोकळी मैदाने आरक्षित केलेली आहे.

शासन निर्णयानुसार सिडको वासीयांना सर्व भौतीक सोई-सुविधा पुरविण्याची तसेच देखभालीची जबाबदारी महानगरपालिके कडे असल्याने औरंगाबाद महानगरपालिकेने आपले कर्तव्य समजुन सिडको परीसरात नियमित रस्ते/ड्रेनेज/पाणी पुरवठा/विद्युत देखभाल दुरुस्तीसह नागरीकांना सोईची विविध महत्वाचे प्रकल्प प्रस्तावित केलेली आहेत.

सिडको-हडको वासीयांची तसेच शहरातील क्रिडाप्रेमिंची मागणी लक्षात घेवुन सिडको एन १० टि.व्ही.सेंटर येथील क्रीडांगणासाठी आरक्षित असलेल्या मोकळया जागेवर सुसज्ज असे स्टेडीयम कॉम्पलेक्स उभारण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

सदरील स्टेडीयम कॉम्पलेक्स हे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता सिडकोने विकसित केलेल्या राजीव गांधी स्टेडीयमच्या धर्तीवर क्रीडांगणाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुने बांधण्यात येणा-या ७१ शॉपलेट /दुकानां पैकी १ दुकान महानगरपालिकेसाठी ठेवुन उर्वरीत ७० शॉपलेट /दुकाने रितसर अटी व शर्तीसह ३० वर्षासाठी भाडे-तत्वावर(Lease Rent)वर देवुन तसेच संबधित गाळेधारकांकडुन आगावु स्वरुपात रक्कम घेवुन उभारण्याचे प्रस्तावित आहे.जेणेकरुन प्रकल्पाची उभारणी करतांना महानगरपालिकेवर सध्यस्थितीत कोणताही आर्थिक भार येणार नाही.

प्रस्तावित प्रकल्पां अंतर्गत एकुण ७१ दुकाने तयार करावयाची असुन प्रत्येक दुकानाचे एकुण क्षेत्रफळ हे सुमारे ३०.०० चौ.मीटर असणार आहे.त्या अंतर्गत ४.७० मी.X ३.०० मीटरचे दुकान + ३.०० मी. X ३.०० मीटरचे स्टोअर + २.७० मी. X ३.०० मीटरचे वापरण्यायोग्य पोटमाळा(Mezannine)चा समावेश करण्यात येणार आहे.

सदर स्पोर्टस कॉम्पलेक्स विकसित करणे करीता अंदाजे रक्कम रुपये ४,१२,७००००/- चा खर्च प्रस्तावित असुन भाडे तत्वावर दयावयाच्या एकुण ७० दुकानांकरीता प्रत्येकी किमान १०,००,०००/-इतकी आधारभुत किमंत(Baisc price) ठेवण्याचे प्रस्तावित आहे.

सदरील दुकानांचे वाटप हे इंडीयन कॉन्ट्रक्ट ॲक्ट कायद्याखाली करार करण्यास पात्र असलेली व्यक्ती/संस्था/शासकीय संस्था/निमशासकीय संस्था/कंपनी/आस्थापना यांचे कडुन

रितसर जाहीर सुचनेव्दारे बंद लिफाफ्यात(sealed –offer) खालील अटी व शर्तीसह मागविण्याचे प्रस्तावित आहे.

शॉपलेट नोंदणीसाठी पात्रता :-

१. प्रस्तावित दुकानांसाठी इंडीयन कॉन्ट्रक्ट ॲक्ट कायद्याखाली करार करण्यास पात्र असलेली व्यक्ती.
२. विश्वस्थ संस्था/कंपनी /सामाजिक/शासकीय/निमशासकीय आस्थापने करीता दुकान घ्यावयाचे असल्यास व्यवस्थापकीय संचालक अथवा संचालक मंडळाने नेमुन दिलेल्या संचालकाच्या स्वाक्षरीने व शिक्क्यासह रितसर अर्ज दाखल करावा लागेल.
३. स्थानिक भागीदारी संस्थेला अर्ज दाखल करावयाचा असल्यास सर्व भागीदारांच्या स्वाक्षरी सह अर्जासोबत भागीदारी करारपत्राची सत्यप्रत जोडणे आवश्यक राहील.
४. स्थानिक सहकारी सं्स्थेस अर्ज दाखल करावयाचा असेल तर त्या संस्थेचा अध्यक्ष किंवा सचिव यांच्या स्वाक्षरीने रितसर अर्ज दाखल करावा लागेल.
५. एका व्यक्तीस/व्यावसायिकास/संस्थेस/कंपनीस स्टेडीयम कॉम्पलेक्स मधिल एकाच दुकानासाठी अर्ज सादर करता येईल.
६. अर्जदारास संस्थेचे/कंपनीचे/स्वतहाचे पॅनकार्ड प्रत सादर करणे बंधनकारक राहील.
७. सदर एकुण दुकाना पैकी ५ टक्के दुकाने मागासवर्गीयांसाठी (SC/ST),२ टक्के दुकाने अंध व अपंगासाठी तसेच ३० टक्के दुकाने हे महिलांसाठी आरक्षित असणार आहे.
८. दुकानांचे वाटप खालील प्रमाणे करण्यात येणार आहे.

अ) योजनेतील अर्जधारकांचे रितसर भरलेले अर्ज बंद लिफाफ्यात(sealed –offer)प्राप्त झाल्यानंतर ज्या अर्जधारकांनी सर्वात जास्तीचे दर भरलेले आहे अश्या अर्जधारकांपैकी अनुक्रमे पहिल्या १० अर्जधारकास त्यांनी भरणा केलेल्या उच्चतम दरानुसार दुकानांचे वाटप अर्जधारकाच्या इच्छेनुसार करण्यात येणार आहे. (समान दर आल्यास सोडत पध्दतीने वाटप करण्यात येईल)

ब)पहिल्या १० अर्जधारकांस दुकानांचे वाटप केल्यानंतर उर्वरीत दुकाना पैकी ५ टक्के म्हणजे ३ दुकाने मागासवर्गीयांसाठी (SC/ST),२ टक्के म्हणजे १ दुकान अंध व अपंगासाठी तसेच ३० टक्के दुकाने म्हणजेच १५ दुकाने हे महिलांसाठी आरक्षित असल्याने याबाबतचे आरक्षण काढण्यात येणार आहे तसेच दुकानांचे वाटप ज्या अर्जधारकांनी आरक्षण अंतर्गत उच्चतम दर दाखल केलेले आहे अश्यांना उक्त अटी व शर्ती अ मधिल पध्दतीचा अवलंब करुन दुकानांचे वाटप आरक्षणातील दुकानांतुन करण्यात येणार आहे.

क)योजनेतील अटी व शर्ती क्रं. ८ अ व ब नुसार दुकानांचे वाटप झाल्यानंतर उर्वरीत दुकानांचे वाटप ही ज्या अर्जधारकांनी उच्चतम दर दाखल केलेले आहे अश्यांना उक्त अटी व शर्ती अ मधिल पध्दतीचा अवलंब करुन दुकानांचे वाटप उर्वरीत दुकानांतुन करण्यात येणार आहे.

९. मागासवर्गीय वर्गामध्ये अर्ज सादर करणा-यांनी जातीचे प्रमाणपत्र परिशिष्ट ब मधील अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील तसेच अंध व अपंगानी विकंलागतेचे शासकीय वैदयकीय प्रमाणपत्रही परिशिष्ट ब मधील अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

शॉपलेट नोंदणीची पध्दत :-

१. माहिती पुस्तीकेतील परिशिष्ट - ब वरील अर्ज रक्कम रुपये १००/-च्या मुद्रांकावर नोंदणीकृत नोटरी करुन सादर करणे बंधनकारक राहील.
२. महानगरपालिकेने माहिती पुस्तिकेतील (परिशिष्ट - अ मध्ये) दर्शविलेल्या प्रत्येक दुकानांसाठी निर्धारीत केलेल्या आधारभुत किमंतीत किंवा त्यापेक्षा जास्तीची किमंत आल्यासच दुकानांचे वाटप करण्यात येणार आहे.आधारभुत किमंतीपेक्षा कमी आलेल्या किमंतीचा तसेच त्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.
३. अर्जासोबत अर्जदारास संपुर्ण नाव,परीपुर्ण पत्ता,दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक लिहीणे बंधन कारक राहील.अर्जासोबत अर्जदारास रहिवाशी पुरावा जोडणे बंधनकार राहील उदाः निवडणुक ओळखपत्र,विद्युत मिटर भरणा पावती/टेलीफोन बील भरणा पावती/आधार कार्ड प्रत इत्यादी पैकी एक पुरावा सादर करावा लागेल.
४. अर्जदारास माहिती पुस्तिकेतील परीशिष्ट - अ मध्ये दर्शविलेले अनामत रक्कमेची मनपा पावती/धनाकर्ष परिशिष्ट ब वरील अर्जासह जोडणे बंधनकारक राहील.
५. माहिती पुस्तिकेचे शुल्क रुपये ५०००/- हे विनापरतावा राहील तसेच अपुर्ण अर्ज स्विकारण्यात येणार नाही.
६. माहिती पुस्तिकेतील अटी व शर्तींनुसार परिशिष्ट - ब मध्ये दर्शविलेला रितसर अर्ज विहीत कालावधीत महानगरपालिकेच्या लेखा विभागात सादर करावा लागेल.

शॉपलेट नोंदणीसाठी अटी व शर्ती :-

१. सदरील स्टेडीयम कॉम्पलेक्स मधिल प्रत्येक शॉपलेट/दुकाने करीता स्वतंत्र अर्ज सादर करावा लागेल.(प्रत्येक दुकानासाठी आधारभुत किमंत किंवा त्यापेक्षा जास्त दाखल केलेली किमंत(Offer)
२. प्रकल्पा अंतर्गत दुकानांसाठी यशस्वी अर्जदाराने दुकाने घेण्यास नकार दिल्यास त्याने भरणा केलेली अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार संपुर्णतः महानगरपालिकेचा राहणार आहे.
३. निविदाधारकाने दाखल केलेले दराची रक्कम खालील प्रमाणे चार टप्प्यात महानगरपालिकेच्या लेखा विभागात जमा करावी लागेल.

| अ. क्रं. | कामाची प्रगती | निविदाधारकाने दयावयाची नापरतावा रक्कम(टक्केवारी) (दाखल केलेल्या किमंतीच्या) |
|---|---|---|
| १ | यशस्वी निविदाधारकास दुकाने वाटपाचे पत्र देते वेळेस | किमंतीच्या २५ टक्के प्रिमीयम (सदर रक्क्म भरणे संबधितास बंधनकारक राहणार असुन या रक्कमे अंतर्गत संबधिताची अनामत रक्क्म समायोजीत करण्यात येणार आहे.) |
| २ | दुकान वाटप पत्र दिल्यानंतर ३० दिवसांत. | किमंतीच्या ३५ टक्के |
| ३ | दुकान वाटप पत्र दिल्यानंतर ९० दिवसांत. | किमंतीच्या २५ टक्के |
| ४ | दुकानाचे काम पुर्णत्वानंतर प्रत्यक्ष ताबा देण्यापुर्वी. | किमंतीच्या १५ टक्के |

४. यशस्वी निविदाधारकाने महानगरपालिकेस देय रक्कमे बाबतचा पहिला टप्पा भरणा केल्यानंतर उर्वरीत दुस-या टप्प्यानुसार ३० दिवसांत देय रक्कमेचा भरणा

महानगरपालिकेत न केल्यास यशस्वी निविदाधारकाचे दुकान रदद करण्यात येवुन त्याने दाखल केलेले पहिल्या टप्प्यातील संपुर्ण रक्कम महानगरपालिका जप्त करुन घेईल.

५. यशस्वी निविदाधारकास दुकाने वाटपानंतर प्रथम तीन वर्षासाठी रक्कम रुपये १०००/प्रति माह भाडे (Lease Rent)आकारणी करण्यात येईल तसेच प्रत्येक तीन वर्षानंतर प्रचलित भाडयामध्ये १२ टक्के वाढ करण्यात येईल.

६. यशस्वी निविदाधारकास प्रत्येक तीस वर्षानंतर रितसर नुतनीकरण करणे असल्यास महानगरपालिकेच्या त्यावेळेसच्या अटी व शर्तीनुसार नुतनीकरण करणे बंधनकारक राहील.नुतनीकरण करणे किंवा भाडे पटटा रदद करणे याबाबतचा सर्वस्वी अधिकार महानगरपालिकेचा राहिल.

७. यशस्वी निविदाधारकास दुकाने वाटपानंतर स्वतहाःच्या खर्चाने विद्युत मिटर/पाणीपुरवठा कनेक्शन घ्यावे लागेल यासाठी महानगरपालिके मार्फत फक्त नाहरकत प्रमाणपत्र पुरविण्यात येईल. तसेच दरमहा/वार्षिक येणारे विद्युत मिटर/पाणीपुरवठा कनेक्शन/मालमत्ता कर बील संबधितास स्वतहाः भरावे लागेल.

८. यशस्वी निविदाधारकास वाटप करण्यात येणा-या दुकाना मधिल विद्युत वायरींगचे काम महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र घेवुन करावे लागेल.

९. यशस्वी निविदाधारकास वाटप करण्यात येणा-या दुकाना बाबत रक्कम रुपये १०००/-प्रति माह भाडे महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागात जमा करावे लागेल.

१०. यशस्वी निविदाधारकास वाटप करण्यात येणा-या दुकानाच्या सभोवतालचा परीसर स्वच्छ ठेवण्यासाठी लागणा-या खर्चापोटी दर माह रुपये ५/- प्रति चौ.मी.सेवा शुल्क म्हणुन महानगरपालिकेच्या संबधित वॉर्ड कार्यालयात जमा करावे दयावे लागेल.

११. यशस्वी निविदाधारकास दुकानाचे वाटप केल्यानंतर तसेच प्रत्यक्ष ताबा मिळाल्यानंतर महानगरपालिकेस एक वर्षाचे आगाऊ भाडे जमा करावे लागेल तसेच प्रत्येक वर्षाच्या सुरवातीला एप्रिल अखेर भाडे जमा करावे लागेल अन्यथा त्यावर १८ टक्के व्याज आकारले जाईल.

१२. महानगरपालिके कडे भरणा करण्यात येणारी Offer रक्कम हि नापरतावा राहील.

१३. यशस्वी निविदाधारकास दुकाने वाटपानंतर दुकाने परस्पर हस्तांतर करुन देणे किंवा पोटभाडेकरु ठेवता येणार नाही.परंतु मुळ भाडेकरुचे वारसाचे नावांची नोंद घेणे करीता संपुर्ण मालमत्ता कर दुकानाचे भाडे, व इतर कर भरुन संबधितास नामांतर करुन घेता येईल.(आवश्यक नामांतर शुल्क संबधितास भरणा करावा लागेल)

१४. यशस्वी निविदाधारकाने दुकाने वाटपानंतर दुकानांचा वापर त्या इमारतीमधील इतर व्यक्तींना/संस्थेला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही अश्या प्रकारे करण्यास बंधनकारक राहील.

१५. महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावली (DCR)नुसार दुकानांचा वापर करणे संबधितास बंधनकारक राहील.

१६. दुकानांचा वापर मद्य विक्री/परमीट रुम/मांसाहारी/पीठाची गिरणी/छापखाना/स्फोटक वस्तुंचे दुकानांसाठी करण्यासाठी परवानगी देण्यात येणार नाही.(अश्या व्यावसायीकांनी बोली मध्ये अथवा दुकानांसाठी अर्ज दाखल करु नये)

१७. यशस्वी निविदाधारकास दुकाने वाटपानंतर महानगरपालिकेचा मालमत्ता कर (सर्वसामान्य कर)व इतर सर्व कर नियमाप्रमाणे भाडया व्यतिरिक्त प्रत्येक वर्षी भरावे लागेल.

१८. दुकाने तारण ठेवण्याचा तसेच त्यावर आर्थिक बोजा निर्माण करण्याचा कोणताही अधिकार यशस्वी निविदाधारकास राहणार नाही असे निदर्शनास आल्यास दुकान परत रिकामे करुन घेण्यात येईल.

१९. दुकानांमध्ये महानगरपालिकेच्या पुर्व परवानगी शिवाय कोणताही फेरबदल करता येणार नाही.तसेच यशस्वी निविदाधारकास अकृषिक कराचा भरणा स्वत करावा लागेल.

२०. निविदाधारकाने ताबा रक्कमेसह भाडेपटटयाची संपुर्ण रक्कम भरल्यानंतर व इतर अटी व शर्तीची पुर्तता केल्यानंतर तसेच दुकानाचा ताबा घेतल्यानंतर महानगरपालिके सोबत रितसर करारपत्र स्वखर्चाने करुन घ्यावा लागेल तसेच निविदाधारकाने महानगरपालिके सोबत भाडेपटटा करारनामा(ॲग्रीमेंट टु लिज)करण्याकरीता रुपये १००/- चे दोन मुद्रांक पेपर (स्टॅम्प पेपर)सोबत आणणे आवश्यक आहे.

२१. निविदाधारकाने दुकानाचा ताबा घेतल्यानंतर दुकानाचे रक्षण व जतन करण्याची संपुर्ण जवाबदारी दुकानदाराची राहील. क्षती (नैसर्गिक आपत्ती)झाल्यास त्यास महानगरपालिका प्रशासन जवाबदार राहणार नाही.

२२. निविदाधारकाने मनपासोबत करारपत्र झाल्यानंतर नोंदणी उपनिबंधक नोंदणी ,जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथे विहीत स्टॅम्पडयुटी व नोंदणी रक्कम भरणा करुन दुकानाचे भाडेपटटा (लिजडिड)करावी व त्याची प्रमाणित प्रत महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागात सादर करावी.

२३. एखादा निविदाधारक दुकाने योजनेत अयशस्वी झाल्यास त्याची जमा अनामत रक्कम (खुल्या प्रवर्गातील निविदाधारकाचे रुपये १.०० लक्ष तसेच मागासवर्गीय(sc/st) व अंध/अपंगासाठी देय असलेल्या निविदा धारकाचे रु. ०.५० लक्ष ) विनाव्याज संबधितास परत करण्यात येईल.(अनामत परत घेण्यासाठी अर्जदारास स्वतहा यावे लागेल तसेच सोबत फोटो ओळखपत्र आणावे लागेल)

२४. दुकान संकुलातील प्रत्येक यशस्वी निविदाधारकास एक सोसायटी स्थापन करावी लागेल.प्रत्येक दुकानावर (भाडेधारक)हा सोसायटीचा विना अर्ज सभासद होईल.सोसायटीचे सर्व नियम व अटी प्रत्येक सभासदास बंधनकारक राहील.हया सोसायटीचे अटी व नियम महानगरपालिका ठरवुन देईल ते सर्व सोसायटीच्या सभासदांनाना बंधनकारक राहील.

२५. यशस्वी निविदाधारकाने जमा केलेली अनामत रक्कम त्याच्या एकुण देय प्रिमीयम रक्कमेत समायोजित करण्यात येईल.

२६. माहिती पुस्तिकेतील परिशिष्ट क ते इ वर अनुक्रमे प्रकल्पाबाबतचा स्थळदर्शक नकाशा,प्रस्तावित दुकानांबाबतचा नकाशा तसेच प्रारुप स्वरुपात एका दुकानाचा नकाशा जोडलेला आहे.

२७. दुकाने भाडेपटटयाने विक्रीबाबतच्या योजनेमध्ये कोणतेही बदल किंवा दुरुस्त्या करण्याचे किंवा कोणतेही कारण न दाखविता प्राप्त निविदा अर्ज रदद करण्याचे अधिकार आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी राखुन ठेवलेला आहे.

२८. सदरील योजने सबंधी नियम,अटी व शर्ती मध्ये काही वाद निर्माण झाल्यास यासंबधी अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांचे कडे राहतील व त्यांनी दिलेला अंतिम निर्णय हा अर्जदारास बंधनकारक राहील.

करीता उक्त अटी व शर्तीसह प्रस्तावा सोबतच्या परिशिष्ठ अ तसेच परिशिष्ठ ब वरील अर्जाचा मसुदा , क्रिडांगणाच्या रस्त्याच्या बाजुने बांधण्यात येणा-या ५१ शॉपलेट दुकानां पैकी एकुण ५० शॉपलेट/दुकाने ही ३० वर्षासाठी भाडे-तत्वावर(Lease Rent) देवुन संबधित गाळेधारकांकडुन जाहीर सुचनेव्दारे बंद लिफाफ्यात(sealed –offer) मागविने व आगावु स्वरुपात रक्कम घेवुन स्टेडीयमची उभारणी करणे, स्टेडीयम विकसित करणे करीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०१३-१४ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ४,१२,७०,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणे, प्रत्येक ५० दुकानांकरीता प्रत्येकी किमान १०,००,०००/-इतकी आधारभुत किमंत(Baisc price) ठेवणे,दुकाने

बांधकामासाठी रितसर ई निविदा कार्यवाही करणे,दुकाने बांधकाम प्रकल्पासाठी पीएमसीची नियुक्ती करणे,दुकाने व स्टेडीयम विकसित करणे अंतर्गत येत असलेली बांधकामे काढणे सदरील दुकानां अंतर्गत आरक्षण ठेवावयाच्या दुकानांसाठी Evaluation समिती नेमुन दुकानांचे आरक्षण काढणे तसेच प्रकल्पा संदर्भाने वेळोवेळी आवश्यक कार्यवाही करणे बाबतचा अधिकार आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना देणे बाबतचा धोरणात्मक प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन १० टि.व्ही.सेंटर येथील क्रीडांगणासाठी आरक्षित असलेल्या मोकळया जागेवर सुसज्ज असे स्टेडीयम कॉम्पलेक्स उभारण्या करीता प्रस्तावातील अटी व शर्ती ज्यात शॉपलेट नोंदणी पात्रतेसाठी अ.क्र. १ ते ९ व शॉपलेट नोंदणी पध्दतीतील अ.क्र. १ ते ६ तसेच शॉपलेट नोंदणीसाठी अटी शर्ती अ.क्र. १ ते २८ या अटी शर्तीसह परिशिष्ठ अ तसेच परिशिष्ठ ब वरील अर्जाचा मसुदा या नुसार क्रिडांगणाच्या रस्त्याच्या बाजुने बांधण्यात येणा-या ७१ शॉपलेट दुकाने प्रस्तावातील दर्शविलेल्या क्षेत्रफळ नुसार एकुण ७० शॉपलेट/दुकाने ही ३० वर्षासाठी भाडे-तत्वावर (Lease Rent) देवुन संबधित गाळेधारकांकडुन जाहीर सुचनेव्दारे बंद लिफाफ्यात (sealed–offer) मागविने व आगावु स्वरुपात रक्कम घेवुन स्टेडीयमची उभारणी करणे,स्टेडीयम विकसित करणे करीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०१३-१४ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ४,१२,७०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच प्रत्येक ७० दुकानांकरीता प्रत्येकी किमान १०,००,०००/-इतकी आधारभुत किमंत (Baisc price) ठेवणे, दुकाने बांधकामासाठी रितसर ई निविदा कार्यवाही करणे,दुकाने बांधकाम प्रकल्पासाठी पीएमसीची नियुक्ती करणे,दुकाने व स्टेडीयम विकसित करणे अंतर्गत येत असलेली बांधकामे काढणे सदरील दुकानां अंतर्गत आरक्षण ठेवावयाच्या दुकानांसाठी Evaluation समिती नेमुन दुकानांचे आरक्षण काढणे तसेच प्रकल्पा संदर्भाने वेळोवेळी आवश्यक कार्यवाही करणे बाबतचा अधिकार मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाकडून अग्निसुरक्षा अभियानांतर्गत शासकीय अनुदान रुपये १,७८,५०,०००/- प्राप्त झाले आहेत. या अनुदानातुन मराठवाड्यातील आठ जिल्हयामध्ये भुकंप, चक्रीवादळ,महापुर, रोड अपघात, दंगली, केमीकल आघात यासाठी EOC इमारतीचे बांधकाम करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. प्राप्त अनुदाना मधून पदमपुरा भागातील महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशमनदल इमारतीवर आपतकालीन व्यवस्थापन केंद्रासाठी अतिरीक्त मजल्यांची वाढ करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन २०११-२०१२ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये २,५६,००,०००/- तयार करुन त्यास मा.सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०५/२०१२ विषय क्रमांक ७५९ अन्वये मान्यता घेण्यात येवून उक्त कामासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदरील इमारतीचे बांधकाम हे जुने झालेले असल्यामुळे इतारतीची पाहणी करतांना छताचा काही भाग मोडकळीस आलेला दिसून आला त्यामुळे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून अस्तित्वातील ईमारतीच्या मजबुती विषयी (Structural Stability) आवश्यक ती तपासणी करुन घेण्यात आली. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाने तपासणी अहवाला मध्ये अस्तित्वातील ईमारतीवर अतिरीक्त मजल्यांची वाढ करता येणार नाही असे अभिप्राय दिलेले आहेत.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अभिप्रायानुसार अस्तित्वातील जुन्या इमारतीवर अतिरीक्त मजल्याची वाढ करता येणार नसल्यामुळे सदरील इमारत पाडून त्यावर अतिरीक्त मजले बांधण्याबाबतचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये २,५४,०८,६२०/- मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडून अग्निसुरक्षा अभियानांतर्गत शासकीय प्राप्त अनुदानामधून पदमपुरा भागातील महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशमनदल इमारतीवर आपतकालीन व्यवस्थापन केंद्रासाठी अतिरीक्त मजल्यांची वाढ करणे या संदर्भात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अभिप्रायानुसार अस्तित्वातील जुन्या इमारतीवर अतिरीक्त मजल्याची वाढ करता येणार नसल्यामुळे सदरील इमारत पाडून त्यावर अतिरीक्त मजले बांधण्याबाबतचे रक्कम रुपये २,५४,०८,६२०/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पैठणगैट ते गुलमंडी, गुलमंडी ते सिटी चौक व्हाया रंगारगल्ली व सिल्लेखाना ते पैठणगेट, बाराभाई ताजिया ते महात्मा फुले चौक १५ मी.व १८ मी.रुंद रस्त्याचे डांबरीकरण व आधुनिकीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.७ कोटी १५ लक्ष चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. तसेच सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.१३% जास्त दराने करणेस मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना कार्यादेश क्र.AMC/CE/५९५/२०१२ दिनांक ३१/०५/२०१२ अन्वये दिला आहे. या कामांपैकी महात्मा फुले चौक ते बाराभाई ताजिया व पैठणगेट ते गुलमंडी या रस्त्याचे काम प्रगती पथावर आहे. सदर अंदाजपत्रकात प्रस्तावित गुलमंडी ते सिटी चौक व्हाया रंगारगल्ली या रस्त्यावरील जागेबाबत वाद असल्याने अतिक्रमणे अद्याप काढण्यात न आल्याने सद्यस्थिती मध्ये सदर काम होऊ शकत नाही. तसेच सिल्लेखाना ते पैठणगेट या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणेच्या कामात समावेश करण्यात आला आहे.

सदरील कामाची मुळ निविदा रक्कम रुपये ०७.१५ कोटीची असून सदर कामावर आजमितीस रक्कम रुपये ०३.०८ कोटी खर्च झालेला आहे.या कामातील होणारी बचत रक्कम रुपये ३.७० कोटी असुन या बचत रक्कमेतून बी.एस.एन.एल. कार्यालय ते किराण चावडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,००,७७,९९८/- करण्यात आले आहे. पैठणगेट ते गुलमंडी, गुलमंडी ते सिटी चौक व्हाया रंगारगल्ली व सिल्लेखाना ते पैठणगेट, बाराभाई ताजिया ते महात्मा फुले चौक रस्त्याचे मुळ कामात होणाऱ्या बचतीच्या रक्कमेतून स्थळबदलासह वरील नमुद कामे करण्यास तसेच मुळ कंत्राटदार मे.जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे कडून मंजुर निविदा दराप्रमाणे करुन घेणेस मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगैट ते गुलमंडी, गुलमंडी ते सिटी चौक व्हाया रंगारगल्ली व सिल्लेखाना ते पैठणगेट, बाराभाई ताजिया ते महात्मा फुले चौक रस्त्याचे मुळ कामात होणाऱ्या बचतीच्या रक्कमेतून स्थळबदलासह. बी.एस.एन.एल. कार्यालय ते किराण चावडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे रक्कम रु.१,००,७७,९९८/-अंदाजपत्रकानुसार मुळ कंत्राटदार मे.जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे कडून मंजुर निविदा दराप्रमाणे काम करुन घेणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेतील रस्ते रुंदीकरण मोहिमे अंतर्गत शहरातील विविध रस्ते रुंद करुन त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरणाच्या कामासाठी जे रस्ते हाती घेण्यात आले आहेत. त्यापैकी टाऊन हॉल ते मकाई गेट ते लिटल फ्लॉवर शाळा (३० व २४ मीटर रुंद) हा रस्ता आहे. सदर कामाचा ठराव मा. सर्व साधारण सभा विषय क्र. ७२९ दिनांक २०/०४/२०१२ रोजी संपन्न झालेल्या सभेत पारीत झाला आहे. त्यात मे.मॅस्क्ट कन्सट्रक्शन यांची ६.१३% जास्त दराने निविदेस मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार मे.मॅस्क्ट कन्सट्रक्शन यांना कार्यादेश मनपा/शअ/९२/२०१३ दिनांक २६.१२.२०१३ नुसार देण्यात आलेला आहे.

सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.१२,४५,६६,७७१/- आहे. मंजुर विकास योजने नुसार ३० मीटर रुंद रस्त्याचे लिटील फ्लॉवर ते विद्यापीठ गेट ते जयसिंगपुरा ते टाऊन हॉल पर्यंत मंजुर विकास योजनेतील रस्त्याचे भुसंपादन पुर्ण पणे न झाल्यामुळे मुळ अंदाजपत्रकानुसार रस्त्याचे काम पुर्ण प्रस्तावित रुंदीत होणे शक्य नाही. त्यामुळे सदर रस्ता अस्तीत्वातील असलेल्या रुंदीत विकसीत करणे बाबत प्रस्तावीत आहे. त्यामुळे प्रस्तावित कामामधील फुटपाथ, रस्त्याचे रुंदीकरण तसेच दुभाजक इत्यादी बाबींचा कामे करता येणे शक्य नसल्यामुळे या बाबींवर होणाऱ्या खर्चा र.रु.२,२९,३४,६९७/- इतकी बचत होत आहे. या बचती मधुन खालील रस्त्यांची कामे प्रस्तावीत करण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नांव | अ.प.रक्कम |
|---|---|---|
| १ | लिटल फ्लॉवर ते बारा पुल्लागेट | रु.५२,७१,१४३/- |
| २ | ज्युबली पार्क ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज | रु.६७,२०,८२७/- |
| ३ | मकई गेट ते बीबी का मकबरा | रु.७२,२०,०००/- |
| **एकुण** | | **रु.१,९२,११,९७०/-** |

वरील तीन्ही रस्ते वर्दळीचे, शैक्षणिक, व पर्यटन दृष्ट्या महत्वाचे रस्ते आहेत. तसेच हे रस्ते शहरातील मुख्य रस्त्यांना जोडणारे व मुळ निविदेतील रस्त्यास संलग्न असे रस्ते आहेत. तीन्ही रस्त्यांची दुरावस्था झालेली असुन त्यात मोठे मोठे खड्डे पडून नागरीकांना तसेच देशी-विदेशी पर्यटकांना त्रास होत असून त्यामुळे शहराची प्रतिमा मलीन होत आहे. त्यामुळे या रस्त्याची कामे तातडीने हाती घेणे आवश्यक आहे. तरी मुळ अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ होऊ न देता उक्त तीन्ही रस्त्यांची कामे करण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

तरी मुळ निविदेच्या बचतीच्या रक्कमेमधुन सदर तीन्ही रस्त्यांचे वाढीव काम करणे तसेच स्थळ बदलास कृपया मान्यता व्हावी. प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेतील रस्ते रुंदीकरण मोहिमे अंतर्गत टाऊन हॉल ते मकाई गेट ते लिटल फ्लॉवर शाळा या रस्त्याच्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.१२,४५,६६,७७१/- असून मंजुर विकास योजने नुसार ३० मीटर रुंद रस्त्याचे भुसंपादन पुर्ण पणे न झाल्यामुळे मुळ अंदाजपत्रकानुसार रस्त्याचे काम पुर्ण प्रस्तावित रुंदीत होणे शक्य नसल्यामुळे प्रस्तावित कामामधील फुटपाथ, रस्त्याचे रुंदीकरण तसेच दुभाजक इत्यादी बाबींचा कामे करता येणे शक्य नसल्यामुळे या बाबींवर होणाऱ्या खर्चास र.रु.२,२९,३४,६९७/- इतकी बचत होत असून या बचती मधुन मुळ अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ होऊ न देता उक्त तीन्ही रस्त्यांची कामे करणेकरीता मुळ निविदेच्या बचतीच्या रक्कमेमधुन तीन्ही रस्त्यांचे वाढीव काम करणे तसेच स्थळ बदलास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | कामाचे नांव | अ.प.रक्कम |
|---|---|---|
| १ | लिटल फ्लॉवर ते बारा पुल्लागेट | रु.५२,७१,१४३/- |
| २ | ज्युबली पार्क ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज | रु.६७,२०,८२७/- |
| ३ | मकई गेट ते बीबी का मकबरा | रु.७२,२०,०००/- |
| | **एकुण** | **रु.१,९२,११,९७०/-** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६०:-**

मा.सर्वसाधारण सभा दिनांक १८.१०.२०१३ रोजी ठराव क्रमांक ३४९ अन्वये शहरातील एकुण २० रस्त्यांची कामे टप्पा-१ व टप्पा-२ मध्ये करण्यासाठी रक्कम रुपये ३०.३५ कोटीच्या कामासाठी मान्यता प्राप्त झालेली आहे.

प्राप्त मान्यतेनुसार टप्पा क्र.१ मधील खालील कामाचे अंदाजपत्रक जायमोक्यावर पाहणी करुन डी.एस.आर. इ.स.२०१२-१३ अन्वये पी.एम.सी.द्वारे तयार करण्यात आलेले आहे. त्याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**टप्पा क्र.१ मधील कामे**

| अ.क्र. | विषय | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|
| १. | भाई उध्दवराव पाटील चौक ते सिध्दार्थनगर चौक ते टि.व्ही.सेंटर. | २७५८३००० | B.T. / White Topping |
| २. | सेंट्रलनाका ते एसबीआय एन-१ चौक जवळगांव रोड पर्यंतचा मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे | ४५२५८५५७ | White Topping |
| ३. | एस.एस.सी.बोर्ड ते पिरबाजार १५ मी.वि.यो.रस्ता | १२१०३९५१ | White Topping |
| ४. | मल्हारचौक ते जवाहरनगर पोलीस स्टेशन मुख्य रस्ता चौक | १३२२७१०६ | White Topping |
| ५. | हॉटेल AVON ते मुकुंदवाडी मंदिर पर्यंत | ८०२१४२५ | White Topping |
| ६. | स्वातंत्र्यविर सावरकर चौक ते सतिष पेट्रोल पंप ते कोकणवाडी | २९७०१६३५ | B.T. / White Topping |
| ७. | तिरुमला मंगल कार्यालय चौक ते विजय चौक | ६२१४०२४ | White |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | Topping |
| ८. | लिटल फ्लॉवर हायस्कुल ते भावसिंगपूरा गावापर्यंत | २०६७९४७४ | B.T. / White Topping |
| ९. | नाईक कॉम्प्लेक्स ते एन-४ सेक्टर | ९३७३६८१ | B.T. / White Topping |
| १०. | चेलीपूरा पोलीस चौकी ते मदनीचौक मार्गे रोषनगेट जिन्सी, नवाबपूरा ते मोंढा नाला पर्यंत (१५ मीटर रुंद) | २५०११२६२ | B.T. / White Topping |
| ११. | आनंद गाडे चौक ते भाजीवालीबाई चौक ते रमानगर | ३५१००००० | B.T. / White Topping |
| १२. | क्रांतीचौक ते पैठणगेट | २५१३९०२० | White Topping |
| १३. | पोलिस मेस ते आंबेडकरनगर चौक (मार्गे बळीराम पाटील शाळा) | २५२००००० | White Topping |
| | | **२८,२६,१३,१३५** | |

वरील अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर कामाच्या निविदा दिनांक ०६.१२.२०१३ अन्वये ई-टेंडरींग द्वारे मागविण्यात आल्या आहेत.

आता टप्पा क्र.२ मधील खालील कामाचे अंदाजपत्रक इ.स.२०१३-१४ च्या डी.एस.आर. नुसार पी.एम.सी.द्वारे जायमोक्यावर पाहणी करुन बनविण्यात आले आहेत. त्या बाबतचा तपशील खालील प्रमाणे.

**टप्पा क्र.२ मधील कामे**

| अ.क्र. | विषय | अंदाजे खर्च (कोटी मध्ये) | शेरा |
|---|---|---|---|
| १. | महावीरचौक ते दिल्लीगेट विकास योजना रस्ता (३५ मीटर रुंद) अंतर्गत महावीर चौक ते मिलकॉर्नर रस्ता | ३२१९८२७३ | B.T. / White Topping |
| २. | औरंगपूरा ते समर्थनगर स्वातंत्र्यविर सावरकर चौक | १३०४१६२५ | B.T. / White Topping |
| ३. | मिलकॉर्नर ते महात्मा ज्योतीबा फुले चौक औरंगपूरा | १८१६०९९५ | B.T. / White Topping |
| ४. | जळगांव रोड ते राष्ट्रवादी भवन एन-११ सिडको | ५८२६६६९ | B.T. / White Topping |
| ५. | गजानन महाराज चौक ते जयभवानी नगर चौक शिवाजी पुतळया पर्यंत | २६९५१०६५ | B.T. / White Topping |
| ६. | विवेकानंद चौक ते खिंवसरा लॉन्स, रिध्दी सिध्दी हॉल ते अष्टपुत्रे हॉस्पीटल, ऑगस्ट होम ते चौरंगी हॉटेल पर्यंत | ८६०१६८२ | B.T. / White Topping |
| | **एकुण** | **१०४७८०३०९** | |

टप्पा १ व २ मधील कामासाठी एकुण रक्कम रुपये ३८,७३,९३,४४४ एवढा खर्च लागत आहे. तथापी प्रकरणी डांबरी रस्त्यांऐवजी White Topping/सिमेंट कॉंक्रीट चे रस्ते करावयाचे ठरल्यास त्यास सुमारे ३५% जास्तीचा खर्च लागेल. त्यासही कृपया मान्यता व्हावी. उक्त

रस्त्यांच्या कामाचे अंदाजपत्रके पी.एम.सी. मे.जगप्रयाग इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व मे.क्रिएशन इंजिनिअर्स यांच्या कडुन बनविण्यात आलेले आहेत.

या कामासाठी नियुक्त पी.एम.सी. ही निविदा पुर्व कामे करणे, कामांचे आदेश दिल्यानंतर कामांचा दर्जा व गुणवत्ता बाबत कामावर देखरेख करणे, तांत्रिक मार्गदर्शन करणे, कामाची मोजमापे घेणे व त्यांची नोंद मोजमाप पुस्तिकेमध्ये घेणे व कामात वापरण्यात येणाऱ्या सर्व साहित्यांची तपासणी करणे इत्यादी निविदेनंतरची कामे करणार आहेत. त्यासाठी त्यांना अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.७५% + Service Tax (Applicable) फीस देण्यात येईल.

करीता टप्पा क्र.१ व २ मधील एकुण २० कामाच्या अंदाजित रक्कम रुपये ३८,७३,९३,४४४ + लेमन ट्री हॉटेल जालना रोड ते हर्सूल टी पॉईंट पर्यंत सर्व्हीस रोडच्या रुंदीकरणासही सिमेंट रस्ता (White topping) करण्याचे कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रुपये ३,१२,७८,५००/- एकुण रुपये ४१,८६,७१,९४४/- ला सविस्तर अंदाजपत्रकास मान्यता देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेसाठी सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टप्पा क्र १ व २ मधील एकूण २० कामाच्या अंदाजित रक्कम रुपये ३८,७३,९३,४४४ + लेमन ट्री हॉटेल जालना रोड ते हर्सुल टी पाईट पर्यंत सर्व्हीस रोडच्या रुंदीकरणासही सिमेंट रस्ता करण्याचे (White topping) कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रुपये ३,१२,७८,५००/- अशा एकुण रुपये ४१,८६,७१,९४४/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. तसेच प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे या कामासाठी नियुक्त केलेल्या पी.एम.सी. ही निविदा पुर्व कामे करणे, कामांचे आदेश दिल्यानंतर कामांचा दर्जा व गुणवत्ता बाबत कामावर देखरेख करणे, तांत्रिक मार्गदर्शन करणे कामाची मोजमापे घेणे व त्याची नोंद मोजमाप पुस्तिकेमध्ये घेणे व कामात वापरण्यात येणाऱ्या सर्व साहित्यांची तपासणी करणे इत्यादी निविदेनंतरची कामे

करण्यास व यासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.७५ % + Service Tax (Applicable) फीस देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८३ येथील विकास कामासाठी सन २०१३-२०१४ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असून खालील प्रस्तावित कामाऐवजी सुधारित कामासाठी तरतुद ठेवण्यात येवून काम हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| वार्ड क्र.८३ विविध ठिकाणी पुर्नडांबरीकरण करणे. SCR-E-9 अ.क्र.14<br>रक्कम रुपये २०.०० लक्ष | १. वार्ड क्र.६३ यो ठिकाणी फुटपाथची विविध विकास कामे करणे. रक्कम रुपये १०.०० लक्ष.<br>२. वार्ड क्र.४८ सिंहगड कॉलनी येथे विविध विकास कामे करणे. रक्कम रुपये १०.०० लक्ष. |

सुचक:- श्री.सुर्यकांत जायभाये.

अनुमोदक:- श्री.विजय वाघचौरे, श्री.विरभद्र गादगे, श्री.जगदिश सिध्द.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणेवार्ड क्र.८३ येथील विकास कामासाठी सन २०१३-२०१४ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असून खालील प्रस्तावित कामाऐवजी सुधारित कामासाठी तरतुद ठेवण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| वार्ड क्र.८३ विविध ठिकाणी पुर्नडांबरीकरण करणे. SCR-E-9 अ.क्र.14<br>रक्कम रुपये २०.०० लक्ष | १. वार्ड क्र.६३ यो ठिकाणी फुटपाथची विविध विकास कामे करणे. रक्कम रुपये १०.०० लक्ष.<br>२. वार्ड क्र.४८ सिंहगड कॉलनी येथे विविध विकास कामे करणे. रक्कम रुपये १०.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, खालील कामासाठी बजेट वळती करण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

| पान क्र. व अ.क्र. | २०१३-१४ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे बाबत |
|---|---|---|
| Ward-B Spill 40 अ.क्र. 04 | वार्ड क्र.१९ शिवनेरी कॉलनी म्हाडा वार्डातील (आंबेडकर चौक जळगांव टी पॉईंट ते बळीराम पाटील शाळा) या मुख्य रस्त्यावर पथदिव्यांकरीता LED fitting लावणे. | वार्ड क्र.१९ मध्ये विविध ठिकाणी उर्जा बचत दिवे व पोल सहीत लावणे. |

सुचकः- श्री.अनिल जुगललाल जैस्वाल.

अनुमोदकः- श्री.गोपाळ कुलकर्णी, श्री.किशोर नागरे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खालील कामासाठी बजेट वळती करण्यासाठी परवानगी देण्यात मंजूरी देण्यात येते

| पान क्र. व अ.क्र. | २०१३-१४ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे बाबत |
|---|---|---|
| Ward-B Spill 40 अ.क्र. 04 | वार्ड क्र.१९ शिवनेरी कॉलनी म्हाडा वार्डातील (आंबेडकर चौक जळगांव टी पॉईंट ते बळीराम पाटील शाळा) या मुख्य रस्त्यावर पथदिव्यांकरीता LED fitting लावणे. | वार्ड क्र.१९ मध्ये विविध ठिकाणी उर्जा बचत दिवे व पोल सहीत लावणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्रमांक ४६३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्रमांक २५ येथील अयोध्यानगर एफ सेक्टर मधील संरक्षक भिंत बांधण्यासाठी ठेवलेले ०८ लाख रुपये हे वार्ड क्र.२५ जी-१ सेक्टर येथे सामाजिक सभागृह बांधण्यासाठी खर्च करण्याच्या कामाला मंजुरी दयावी.

सुचकः- श्री.काशीनाथ हरीभाऊ कोकाटे.

अनुमोदकः- श्री.मीर हिदायत अली, श्री.अनिल मकरिये, श्री.प्रल्हाद निमगांवकर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्रमांक २५ येथील अयोध्यानगर एफ सेक्टर मधील संरक्षक भिंत बांधण्यासाठी ठेवलेले ०८ लाख रुपये हे वार्ड क्र.२५ जी-१ सेक्टर येथे सामाजिक सभागृह बांधण्यासाठी खर्च करण्याच्या कामाला मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७० विद्यानगर अंतर्गत महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेत महापालिकेची शाळा उभारण्याबाबत या प्रभागातील नागरिकांची मागणी आहे. करिता वार्ड क्र.७० विद्यानगर अंतर्गत असलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या

खुल्या जागेपैकी शाळेसाठी योग्य असलेल्या जागी, महानगरपालिकेच्या वतीने महापालिकेच्या शाळेसाठी इमारत बांधण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचकः- श्री.पंकज भारसाखळे. अनुमोदकः- श्रीमती छाया वेताळ.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.७० विद्यानगर अंतर्गत असलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेपैकी योग्य असलेल्या जागी महानगरपालिकेच्या शाळेसाठी इमारत बांधण्याकरीता महापालिकेच्या वतीने प्रशासनाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ. सलीम अली सरोवर सौंदर्यीकरण व विकसीत करणे बाबतच्या पहिल्या टप्प्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये ५.०० कोटीच्या प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ३४०, दिनांक २०.११.२००८ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. या कामाचा खर्च सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात सलीम अली सरोवर विकास योजना या लेखाशिर्षा मधून करण्यात येत असून उक्त कामासाठी मराठवाडा विकास कार्यक्रम-२००७ अंतर्गत शासनाकडून रूपये २.०० कोटी एवढा निधी प्राप्त झालेला आहे.

सदरील कामाची जाहिर निविदा मागविली असता, निविदा प्रक्रियेनंतर वाटाघाटी अंती मे.ग्रीनलँड, पुणे यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.३८ % जास्त दरास मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक-०६, दिनांक ३०.०५.२००९ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने अंदाजपत्रकातील काही बाबी कमी केल्याने निविदेतील रक्कम रूपये १.७२ कोटी एवढ्या रकमेची बचत करण्यात आली होती. अंदाजपत्रकातील उर्वरित रक्कम रुपये ३.७२ कोटीचे काम आवश्यकतेनुसार संबंधित निविदाधारक यांचे कडून करून घेण्यात आले असून अंदाजपत्रक निविदा दरासह व अतिरिक्त बाबीसह सदर कामावर आज पावेतो रक्क्म रूपये ४.०९ कोटी एवढा खर्च झालेला आहे.

सदर कामासाठी मराठवाडा विकास कार्यक्रम+२००७ अंतर्गत शासनाकडून रूपये २.०० कोटी एवढा निधी प्राप्त झालेला असल्याने या प्रकल्पाच्या ठिकाणी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मा. पालकमंत्री, मा. खासदार, मा. आमदार, मा. विभागीय आयुक्त, मा. जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी भेट दिलेली आहे. तसेच मान्यवरांनी दिलेल्या सुचनेनुसार व आवश्यकतेनुसार वाढीव कामे प्रस्तावित करण्यात आली असून त्यासाठी वेळोवेळी वाढीव कामासाठी अतिरिक्त बाबींचे अंदाजपत्रक तयार करून मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यामुळे मुळ अंदाजपत्रकीय रकमेत वाढ होत असून एकत्रित सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये ५.४९ कोटींचे अतिरिक्त बाबींसह तयार करण्यात आलेले आहे.

करीता, वाढीव कामासाठी अतिरिक्त बाबींसह एकत्रित रक्कम रुपये १.७७ कोटी या वाढीव रकमेच्या अंदाजपत्रकासह एकूण रक्कम रुपये ५.४९ कोटीच्या सुधारित अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभागृहाच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. सलीम अली सरोवर सौंदर्यीकरण व विकसीत करणे कामाकरीता मराठवाडा विकास कार्यक्रम+२००७ अंतर्गत शासनाकडून रूपये २.०० कोटी एवढा निधी प्राप्त झालेला असल्याने तसेच मान्यवरांनी दिलेल्या सुचनेनुसार व आवश्यकतेनुसार

वाढीव कामे प्रस्तावित करण्यात आली असून त्यासाठी वेळोवेळी वाढीव कामासाठी अतिरिक्त बाबींचे अंदाजपत्रक तयार करून मंजुरी प्राप्त झालेली असून वाढीव कामासाठी अतिरिक्त बाबींसह एकत्रित रक्कम रुपये १.७७ कोटी या वाढीव रकमेच्या अंदाजपत्रकासह एकूण रक्कम रुपये ५.४९ कोटीच्या सुधारित अंदाजपत्रक मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४६६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरामधील खाम नदीवर बांधण्यात आलेल्या मुख्य रस्त्यावरील तीन पूलांचे डागडुजी करणे व नवीन पूलाचे काम करणे आवश्यक आहे. तीन्ही पूलाच्या लगतच्या भागाची स्थिती खालील प्रमाणे आहे.

**१. मकाईगेट येथील प्रस्तावीत पूल :**

टाऊनहॉल ते मकाईगेट या २४ मीटर रूंद विकास योजनेतील रस्त्यावर मकाईगेट येथे दगडी कमानीचा जुना पूल स्थीत आहे. सदर जुन्या पूलावरून आज रोजी रहदारी चालू आहे. सदरील ऐतिहासीक पूलाची डागडुजी करून आहे त्या स्थितीत जतन करून नवीन आर. सी. सी. पूल मकाईगेटच्या उत्तर बाजूला (Upstream side) च्या नियोजीत २४ मीटर विकास योजना रस्त्यामध्ये बांधण्याचे प्रस्तावीत आहे. प्रस्तावीत नवीन पूलासाठी पूर्व-पश्चिम या दोन्ही बाजूच्या अप्रोचेसचा नियोजीत रस्ता आज मितीस मालमत्ता व अतिक्रमाणाने बाधीत आहे.

**२. महेमुदगेट (पानचक्की) येथील प्रस्तावीत पूल :**

ज्युबलीपार्क ते पानचक्की या १८ मीटर रूंद विकास योजनेतील रस्त्यावर महेमुदगेट येथे दगडी कमानीचा जुना पूल स्थीत आहे. सदर जुन्या पूलावरून आज रोजी रहदारी चालू आहे. सदरील ऐतिहासीक पूलाची मोठ्या प्रमाणावर डागडुज करणे आवश्यक आहे डागडुज करून, आहे त्या स्थितीत जुन्या पूलाचे जतन करून नवीन आर. सी. सी. पूल महेमुदगेट लगत उत्तर बाजूला (Upstream side) ला बांधण्याचे प्रस्तावीत आहे.

विकास योजना रस्त्यातील बाधीत मालमत्ता, अतिक्रमणे काढणे आवश्यक आहे. प्रस्तावीत पूलाच्या पश्चिम बाजूच्या Approach साठी पानचक्की समोरील इलेक्ट्रीक पोलचे जंक्शन पॉईंट योग्य त्या ठिकाणी स्थलांतरीत करणे आवश्यक आहे.

**३. बारापुल्ला गेट येथील प्रस्तावीत पूल :**

मिलकार्नर ते बारापुल्ला गेट ते लिटल फ्लॉवर स्कुल हा विकास योजनेतील ३० मीटर रूंदीचा रस्ता असून जून्या पूलाच्या दोन्ही बाजूने जात आहे. विकास योजनेतील रस्त्यावर या रस्त्यावर दगडी कमानीचा जुना पूल स्थीत आहे. सदर जुन्या पूलावरून आज रोजी रहदारी चालू आहे. सदरील ऐतिहासीक पूलाची डागडुज मोठ्या प्रमाणावर करणे आवश्यक आहे. त्यामुळे आहे त्या स्थितीत डागडुज करून जुन्या पूलाचे जतन करून नवीन आर. सी. सी. पूल बारापुल्लागेटच्या उत्तर बाजूला (Upstream side) ला बांधण्याचे प्रस्तावीत आहे. प्रत्यक्ष स्थळावरील स्थिती आणि विकास योजना रस्ता या नुसार बारापुल्ला गेटच्या उत्तर बाजूने (Up stream side) ला सुमारे ८.५० मीटर रूंदी तसेच इलेक्ट्रीक पोल व डी.पी. योग्य त्या ठिकाणी स्थलांतरीत करणे आवश्यक आहे.

अ) उपरोक्त तीन्ही पूलांचे अंदाजपत्रके (Block Estimate) सन २०११-१२ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.११८८.२९ लक्षचे सार्वजनिक बांधकाम खात्याने तयार केली आहेत, त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अ.प.र.रू. |
|---|---|---|
| ०१ | खामनदीवरील मकाईगेट येथील जुन्या पूलाचे जीर्णोद्धार करणे व नवीन पूल बांधणे. | ५३९.२२ लक्ष |
| ०२ | खामनदीवरील महेमुदगेट पानचक्की येथील जुन्या पूलाचे जीर्णोद्धार करणे व नवीन पूल बांधणे. | २९४.६२ लक्ष |
| ०३ | खामनदीवरील बारापुल्लगेट येथील जुन्या पूलाचे जीर्णोद्धार करणे व नवीन पूल बांधणे. | ३५४.४५ लक्ष |
| | एकुण | ११८८.२९ लक्ष |

र.रू. ११८८.२९ लक्ष हा निधी औरंगाबाद महानगरपालिकेस उपलब्ध करून देणेसाठी मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग क्रं.०२, मंत्रालय, मुंबई यांचेकडे जा.क्र./मनपा/शअ/११८/२०१३, दिनांक १३/०३/२०१३ अन्वये अंदाजपत्रकासह प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सन २०११-१२ च्या जिल्हा दरपत्रकानुसार तिन ही पुलांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. आता लागु असलेल्या सन २०१४-१५ च्या जिल्हा दरपत्रकाप्रमाणे जर अंदाजपत्रके करावयाची झाल्यास त्यात होणारी वाढ लक्षात घेता लागणारी वाढीव रक्कम खालील प्रमाणे राहील.

मुळ अंदाजपत्रकाची रक्कम रूपये. ११८८.२९ लक्ष
जिल्हा पत्रक २०१४-१५ च्या दरफरकामुळे होणारी वाढ रक्कम रू. <u>२९७.०७ लक्ष</u>
एकुण रक्कम रू. १४८५.३६ लक्ष

या व्यतिरिक्त या ठिकाणच्या भूसंपादन प्रक्रियेसाठी लागणारा खर्च खालील प्रमाणे आहे.

ब) भुसंपादन प्रक्रियेसाठी लागणारा खर्च

| | | |
|---|---|---|
| ०१ | मिलकॉर्नर ते बारापुल्ला ३० मी. रुंद रस्ता | र.रू. १,४३,१६,७५०/- |
| ०२ | टाऊन हॉल मकईगेट २४ मी. रुंद रस्ता | र.रू. ५,०८,७७,१२०/- |
| ०३ | पानचक्की, महेमुदगेट | र.रू. २१,९५,३७५/- |
| | | र.रू. ६,७३,८९,२४५/- |
| ०४ | विद्युत खांब, डी.पी. हटविणे व तद्संबंधीत कामे करणे. | र.रू. २५,००,०००/- |
| | एकुण खर्च | र.रू. ६,९८,८९,२४५/- |

उपरोक्त प्रमाणे अ+ब चा एकत्रित खर्च रक्कम रुपये २१,८४,२५,२४५/-कोटीला प्रशासकीय मान्यता प्रदान करणेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर, प्रस्ताव मंजूरीअंती उपरोक्त प्रमाणे एकुण प्रकल्पाची किमंत रुपये २१,८४,२५,२४५/- शासनाकडे प्रस्ताव पाठवून अनुदानाच्या रक्कमेची मागणी करण्यात येईल, अनुदान प्राप्ती अंती सदर कामे हाती घेण्यात येतील.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरामधील खाम नदीवर बांधण्यात आलेल्या मुख्य रस्त्यावरील मकाईगेट, महेमूदगेट (पानचक्की), बारापुल्ला गेट या तीनही पूलांचे डागडुजी करणे व नवीन पूलाचे काम करणे आवश्यक असल्याने तीन्ही पूलाच्या लगतच्या भागाची प्रस्तावात दर्शविलेली स्थिती नुसार तसेच प्रस्तावातील अ+ब नुसार दर्शविलेला एकत्रित रक्कम रुपये २१,८४,२५,२४५/- च्या खर्चास मान्यता देण्यात येते. तसेच प्रस्ताव मंजूरी अंती उपरोक्त प्रमाणे एकुण प्रकल्पाची किमंत रुपये २१,८४,२५,२४५/- शासनाकडे प्रस्ताव पाठवून सदरील अनुदानाच्या रक्कमेची मागणी करून अनुदान प्राप्ती अंती सदर कामे महापालिकेच्या वतीने हाती घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**(प्रमोद का. खोब्रागडे)**
**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - [२१]

**गुरूवार दिनांक १६.०१.२०१४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.**

**स.स.श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे.**

**प्रश्न क्र. १२१ :-**

**उत्तर :- (सहाय्यक संचालक नगररचना)**

१. टिळकनगर वॉर्ड क्रमांक ६६ येथील सर्व्हे नंबर १७ मधील ले-आऊट अे.एम.ई/टि.पी/४/३५६४/८५ च्या मध्ये महानगरपालिकेची खुली जागा किती आहे ?

**उत्तर :-** मोहल्ला टिळकनगर सर्व्हे नंबर १७ येथील जा.क्र./मनपा/नरवि/रे/३५६४/१९८५ दिनांक २१/१०/१९८५ अन्वये मंजुर रेखांकन नकाशाप्रमाणे पाच ठिकाणी खुल्या जागा असून एकुण क्षेत्र ९९१५.०० चौ.मी. आहे.

२ या जागेस महानगरपालिकेची जागा म्हणुन नामांतर केले आहे काय ?

**उत्तर :-** नाही.

३ ही जागा महानगरपालिकेने आपल्या ताब्यात घेतली काय ?

**उत्तर :-** उक्त रेखांकनातील खुल्या जागा जमिन मालकाने नोंदणीकृत दस्तऐवज क्र. ६२२६ दिनांक २१/१०/१९८५ अन्वये महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेले आहेत.

४ आज पर्यंत महानगरपालिकेने ही जागा जर महानगरपालिकेची असेल तर तीचे नामांतर का केले नाही. या जागेवर महानगरपालिकेचे नाव का लावले नाही ?

**उत्तर :-** उप संचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश औरंगाबाद यांच्याकडील दि.२९/१२/२०१२ च्या पत्राची प्रत सोबत सादर करण्यात येत आहे.

५ मिरयावर अली हैदर अली यांचे नाव या जागेवर केव्हा आले व त्यांचा न.भू.क्र. काय याची सविस्तर माहिती व महानगरपालिकेच्या कोणत्या प्लॉटवर अतिक्रमीत नाव आहे ?

**उत्तर :-** महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर मिरयावर अली हैदर अली यांनी अधिक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडून दिनांक १६/०२/१९९९ ला स्वत:च्या मालकी हक्काची आखीव पत्रिका तयार करुन घेतली आहे. त्याचा न.भू.क्र. १५८४९/अ/२२८ असा आहे.

६ सर्व्हे नं. २२८ हा नकाशात आहे काय ? नसेल तर मग प्रशासन ज्या पध्दतीने काम करते ते योग्य आहे काय ?

**उत्तर :-** सर्व्हे नंबर २२८ हा या प्रकरणाशी संबंधीत नाही.

७ विकासकानी सादर केलेले विकास निधी भरल्याची पावती, अकृषिकर प्रमाणपत्र तपासले काय ?

**उत्तर :-** परवाना क्रमांक ४२६/२००४-०५ दिनांक ०२/११/२००४ च्या आदेशात बाब क्रमांक २१ मध्ये भूखंडा अंतर्गतची सर्व विकासाची कामे अर्जदारांनी स्वतः करावी तसेच त्याची देखभाल व दुरुस्ती कायम स्वरुपी जबाबदारी अर्जदारावर राहील असे नमुद केलेले आहे.

८ जर ही महानगरपालिकेची जागा असेल तर महानगरपालिकेने कधी अतिक्रमण काढले का?

**उत्तर :-** प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

९ महानगरपालिकेचे ड्रेनेज संबंधीताने तोडले त्याला महानगरपालिकेने काही दंड आकारला काय, आकारला असेल तर त्याने तो भरला काय ? माहिती प्रमाणे दंड दोन लाख ३६ हजार असावा तो भरला काय ?

**उत्तर :-** सदर बाब कार्यकारी अभियंता वॉर्ड इ/फ, यांच्या विभागाशी संबंधीत आहे.

१० महानगरपालिकेने १५८४९/अे हि जागा ताब्यात आहे असे कोर्टात सांगितले काय ?

**उत्तर :-** गैर लागु.

११ ही जागा एस.के.पाटील यांनी भगवानदास त्रिभूवनदास यांच्याकडून खरेदी केली आहे हे सत्य आहे काय ?

**उत्तर :-** एस.के.पाटील यांनी उक्त रेखांकनास मंजुरी प्राप्त केलेली आहे. त्यानुसार त्यापुर्वीचा मिळकत धारकाचा संदर्भ येत नाही.

१२. मा. तेव्हाचे मंत्री महोदय यांनी या जागेच्या बांधकामाला परवानगी दिली होती काय ? दिल्यास कुठल्या आधारे दिली यांची सविस्तर माहिती देण्यात यावी ?

**उत्तर :-** उक्त प्रकरणी राज्य शासनाकडे अपिल दाखल झालेले होते. सदरील अपिलावर राज्य शासनाने निर्णय दिलेला असून निर्णयाची प्रत सोबत सविनय सादर करण्यात येत आहे.

**उत्तरः- (उपआयुक्त सिडको)**

टिळकनगरच्या मंजुर रेखांकनामध्ये ५ खुल्या जागा आहे. या जागेवर महानगरपालिकेचे नाव लावणेचे कार्यवाही प्रकरण कार्यवाही अंतर्गत आहे. तसेच, मंजुर रेखांकनातील सदरील खुल्या जागा नगर रचना विभागाचे पत्र क्र AMC/TPS/Lat/3564/85 दि. २१.१०.१९८५ चे आधारे महानगपालिकेस नोंदणीकृत दस्तावेज क्र. ११२८९ दि. २१.१०.८५ च्या करारपत्राने हस्तांतरीत केलेल्या आहेत. यासंदर्भाने पत्रक्र.मनपा/मामअ/४७/२०१२ दि. १२.०४.२०१२ ने नभुमापन अधिकारी नभुमापन कार्यालय औरंगाबाद यांना या खुल्या जागेच्या मालकी हक्कात महानगरपालिकेच्या नावाची नोंद घेण्यासाठी सादर केले आहे.

**प्रश्न क्र. १२२ :-**

१. जय विश्वभारती कॉलनी यांच्या मालकीचे एकुण खुल्या जागा किंती ? महानगरपालिकेने खुली जागा ताब्यात घेतली आहे काय ?

**उत्तर :-** मोहल्ला जय विश्वभारती हौसिंग सोसायटी येथील मंजुर रेखांकन नकाशाप्रमाणे (जा.क्र. २८०२/७० दि. २८/०१/१९७०) एकुण पाच ठिकाणी खुल्या जागा आहेत.

२. सि.टि. सर्व्हे नंबर १५६११ ही खुली जागा नेमकी कुठे आहे ?सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर :-** उक्त जागा भूखंड क्रमांक ५०, ५१ च्या समोरील ८० फुट रुंद रस्ता फ्रन्टला आहे.

३ जय विश्वभारती को. ऑप सोसायटीच्या खुल्या जागेवर म्हणजेच महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर काही ठिकाणी अतिक्रमण झाले आहे काय ?

**उत्तर :-** भूखंड क्रमांक १५७ ते १६० समोरील जागेवर अतिक्रमण झालेले आहे.

४ संबंधीत सोसायटीमधुन जो मुख्य रस्ता जातो तो किती मिटरचा आहे?

**उत्तर :-** सदरील मुख्य रस्त्याची रुंदी मंजुर रेखांकन नकाशाप्रमाणे ८० फुट (२४ मीटर) आहे.

५ सर्व्हे नंबर १५६११ ही जागा सोसायटीची आहे कि महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेली आहे याची माहिती ?

**उत्तर :-** नगर भूमापन क्रमांक १५६११ ही जागा रेखांकनातील खुली जागा आहे.

६ जर सर्व्हे नंबर १५६११ ही महानगरपालिकेची खुली जागा असेल तर महानगरपालिकेने त्यावर ताबा आहे काय ? किंवा महानगरपालिकेने संबंधीत जागेवर (कंपाऊड) केले आहे काय? नसेल केले तर काय केले नाही याचा खुलासा व्हावा ?

**उत्तर :-** सदर बाब कार्यकारी अभियंता वॉर्ड इ/फ, यांच्या विभागाशी संबंधीत आहे.

**उत्तर:- (उपआयुक्त सिडको)**

जयविश्वभारती कॉलनीच्या एकुण ५ खुल्या जागा आहेत. मंजुर रेखांकनातील खुल्या जागा ताब्यात घेण्याचे काम नगररचना विभागासंबंधीत आहे. व न.भु.क्र. १५६११ चे स्थळ दर्शविण्यासाठी नगरभुमापन भाग नकाशा सोबत जोडला आहे.

**प्रश्न क्र. १२३**

१ रविंद्रनगर येथील प्लॉट नंबर ९ रविंद्रनगर सहकारी गृह निर्माण संस्था (म) या सभासदानी संबंधीत प्लॉटवर अपार्टमेंट बांधकाम परवानगी देऊ नये असा अर्ज मा. आयुक्त यांना दिलेले असतांना व संबंधीत वाद हा मा. उप निंबंधक व मा. विभागीय सहानिंबधक यांच्याकडे चालु असतांना महानगरपालिकेने संबंधीत मालकास अपार्टमेंट बांधकाम परवानगी दिली काय ?

**उत्तर :-** मोहल्ला रविंद्रनगर भूखंड क्रमांक ९ येथे परवाना क्रमांक ७०४/२०१३-१४ दि. १३/१२/२०१३ अन्वये बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. अर्जदार व सबंधीत गृह निर्माण संस्था यांच्यामध्ये काही वाद असल्यास त्यासाठी सक्षम कार्यालय हे उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद हे आहे. त्या कार्यालयाने या प्रकरणात दिनांक १४/०५/२०१३ रोजी निर्णय दिलेला असून त्या आधारे बांधकाम परवानगीचा विचार करण्यात आलेला आहे.

२ सोसायटी संभासदांचा आक्षेप असेल व सदरील प्रकरणाला जैसे थे तर विभागीय सहनिबंधक याचे आदेश असेल तर परवानगी (अपार्टमेंट) साठी देता येते काय ?

**उत्तर :-** महानगरपालिका हे नियोजन प्राधिकरण असून अशा प्रकरणात हस्तक्षेप करण्यास सक्षम नाही.

३ संबंधीत सोसायटी सभासद यांनी मा. आयुक्त, महानगरपालिका यांना वारंवार पत्र व्यवहार केलेला आहे. सदरील बाब लक्षात घेता सभासदांची बाजु ऐकने गरजेचे नव्हते काय ?

**उत्तर :-** मुद्दा क्रमांक ०१ मध्ये खुलासा केल्याप्रमाणे सक्षम कार्यालयाने निर्णय दिलेला आहे.

४ संबंधीत अपार्टमेंटसाठी टि.डी.आर. चा वापर करण्यात आला काय ? असल्यास कुठला व किंती ?

**उत्तर :-** सदर बांधकाम परवानगी प्रस्तावामध्ये अर्जदार यांनी टि.डी.आर वापरलेले नाही.

५ सदरील वाद हा संबंधीत अधिकाऱ्यांकडे चालु असतांना जर परवानगी दिली असेल ती योग्य आहे काय? योग्य नसल्यास आपण संबंधीत अधिकाऱ्यांवर कार्यवाही करणार काय?

**उत्तर :-** महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ व ४५ नुसार व सक्षम शासकीय कार्यालयाचे निर्णया आधारे बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

**(प्रमोद का. खोब्रागडे)**
**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

# परिशिष्ट अ
# महानगरपालिका,औरंगाबाद.
# भाडेपटटयाने दयावयाच्या शॉपलेट बाबत सविस्तर माहिती

| अ क्रं | एकुण दुकाने | प्रती दुकानाचे एकुण क्षेत्रफळ अंदाजे ३०.०० चौ.मी. | | | दुकाने आधार भुत एकुण किमंत | दुकानासाठी अर्जा सोबत भरावयाची अनामत रक्कम | दुकानासाठी प्रति माह भाडे रक्कम | दुकानासाठी अतिरिक्त कर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दुकान (क्षेत्र) | स्टोअर (क्षेत्र) | वापरण्या योग्य पोटमाळा **Mezannine** (क्षेत्र) | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | ५० | ४.५० मीटर **X** ३.०० मीटर | ३.०० मीटर **X** ३.०० मीटर | २.५० मीटर **X** ३.०० मीटर | १०,००,०००/- | खुल्या वर्गासाठी तसेच महिलांसाठी रक्कम रुपये १,००,०००/- तसेच मागावर्गीयां (SC/ST) व अंध व अपंगा करीता रक्कम रुपये ५०,०००/- | रुपये १०००/- प्रति माह तसेच प्रति माह रुपये ५/- प्रति चौ.मी.सेवा शुल्क परीसर स्वच्छतेकरीता | मनपा मालमत्ताकर (वाणिज्य)/ पाणीपुरवठा कर/ अकृषिक कर |

- अनामत रक्कम ही कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅंक/शेडयुल बॅंकेच्या धनाकर्षाव्दारे किंवा महानगरपालिका पावती व्दारे भरावयाची आहे.
- धनाकर्ष (DD) हा उप आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद या नावाने औरंगाबाद शाखेवर देय असणार असावा.

आयुक्त,
औरंगाबाद महानगरपालिका,
टाऊन हॉल,औरंगाबाद.
(०२४०-२३३३५३६ ते ४०)

# परिशिष्ट ब

## महानगरपालिका,औरंगाबाद.

अर्ज क्रमांक – ००१

अर्जदाराने फोटो राजपत्रित अधिकारी/मुख्य कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडुन सांक्षांकित करावा

खुल्या वर्गासाठी/अंध व अपंग/
मागासवर्गीयांसाठी (SC/ST)/
महिलांसाठी

**प्रति,**
**मा.आयुक्त,**
**महानगरपालिका,औरंगाबाद.**

**विषयः-सिडको एन १० टि.व्ही.सेंटर येथील दुकाने ३० वर्षाकरीता भाडेपटटयाने मिळणे बाबत.**

**महोदय,**

**मी/आम्ही स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या सिडको एन १० टि.व्ही.सेंटर येथील दुकाने ३० वर्षाकरीता भाडेपटटयाने दयावयाची जाहीरात वाचली असुन माहिती पुस्तिकेतील तसेच करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती समजुन घेऊन दुकाना करीता निविदा अर्ज बंद लिफाफ्यात(sealed –offer)सादर करीत आहे/आहोत.**

**मी/आम्ही ------------------------------------------------------------------------------------ -------------------------खाली सही करणार महानगरपालिकेव्दारे sealed – offer पध्दतीने वाटप करावयाच्या सिडको एन १० खेळाचे मैदान येथील दुकानां करीता sealed –offer पध्दतीने महानगरपालिकेच्या माहितीपुस्तिकेतील परीशिष्ट अ मध्ये निर्धारीत केलेल्या आधारभुत किमंतीनुसार/ निर्धारीत केलेल्या आधारभुत किमंतीपेक्षा जास्त म्हणजेच रुपये ------------------ चौ.मी.अक्षरी रुपये --------------------------------------------------------या उच्चतम दरानुार निविदा अर्ज सादर करीत आहे/आहोत.**

मी/आम्ही **sealed –offer** पध्दतीने वाटप करण्यात येणा-या उक्त दुकाना करीता परिशिष्ट अ मध्ये दर्शविलेली खुल्या वर्गासाठी/माहिलांसाठीची अनामत रक्क्म रुपये १,००,०००/-(अक्षरी रुपये एक लक्ष)/तसेच अंध व अपंग व मागासवर्गीयांसाठी (SC/ST)ची रक्कम रुपये ५०,०००/-(अक्षरी रुपये पन्नास हजार )चा भरणा मनपा पावती क्रं /राष्ट्रीयकृत/शेडयुल बॅंकेचा धनाकर्ष क्रं.----------------------------------दिनांक ---------------------------चा उप आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद या नावाने औरंगाबाद शाखेवर देय होणारा **sealed –offer** अर्जासोबत जोडला आहे.

मी/आम्ही निविदा मला /आम्हास उपरोक्त दुकाने वाटप झाल्यास महानगरपालिकेव्दारे मला/आम्हास देण्यात येणा-या वाटपपत्रातील विहीत मुदतीच्या आत दुकानाची संपुर्ण रक्कम भरणा केल्यानंतर दुकानांचा ताबा घेवुन करारपत्र(ॲग्रीमेंट टु लिज)तसेच करारनाम्याची नोंदणी जिल्हा नोंदणी उपनिबंधकक कार्यालयात करणार आहे/आहोत.

मी/आम्हाला सदरच्या माहितीपुस्तिकेतील सर्व अटी व शर्ती मान्य असुन निविदे मध्ये मी/आम्ही अयशस्ववी ठरल्यास अर्जासोबत जोडलेला धनाकर्ष परत घेण्यास बांधील आहोत तसेच काही तांत्रिक कारणास्तव ही योजना रदद करावयाचे ठरल्यास अथवा या योजनेमध्ये कोणताही फेरबदल करावयाचे असल्यास कोणतेही कारण न दर्शविता प्राप्त अर्ज रदद करण्याचे अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी राखुन ठेवलेले असुन याबाबत त्यांनी घेतलेले निर्णय माझेवर/आमच्यावर बंधनकारक राहील.

मी/आम्ही सत्यप्रतिज्ञेवर या उक्त दुकाना करीता मागणी अर्ज सादर करतो की मी/आम्ही या निविदा अर्जात दिलेली संपुर्ण माहिती खरी असुन ही बाब चुकीची असल्याचे दुकाने वाटपापुर्वी अथवा वाटपानंतर महानगरपालिकेच्या लक्षात आल्यास माझे/आमचे दुकान वाटपपत्र/करारपत्र रदद करण्याचे व मी/आम्ही भरणा केलेली सर्व रक्कम जप्त करण्याचे अधिकार आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना आहेत व ते माझेवर/आमच्यावर बंधनकारक राहतील.

महानगरपालिका प्रशासनाव्दारे माझेशी/आमच्याशी साध्या टपालाव्दारे/रजिस्टर्ड टपालाव्दारे इ व्दारे करण्यात येणारा पत्रव्यवहार /नोटीस इत्यादी बाबत मी/आम्ही दिलेल्या खालील पत्यावर करावा तसेच मी/आम्ही दिलेल्या खालील

**पत्यात बदलल्यास त्याची पुर्व सुचना महानगरपालिका प्रशासनास देऊ अन्यथा या कारणास्तव होणा-या कायदेशीर बाबीस मी/आम्ही संपुर्णपणे जबाबदार राहणार आहोत.**

**----------------------------------------------------------------------------------------------------------**

**दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक ---------------------------------------------------------------------**

**पॅनकॉर्ड क्रमांक ------------------------------------------------**

**आपला/आपले विश्वासु**

| **अर्जदार/अर्जदारांचे संपुर्ण नाव** | **स्वाक्षरी** |
| --- | --- |
| **१.---------------------------------------------------------------** | **----------------------** |
| **२.---------------------------------------------------------------** | **----------------------** |

**सोबतः-**

**१.अर्जधारकाचे पॅनकॉर्ड सत्यप्रत.**
**२.रहिवाशी व ओळखपत्र (विद्युत/दुरध्वनी बील पावती/पासपोर्ट/आधार कॉर्ड/निवडणुक ओळखपत्र)**
**३.मागासवर्गींयाठी जातीचे प्रमाणपत्र प्रत.**
**४.अंध व अपंगासाठी विकलांगतेचे शासकीय प्रमाणपत्र प्रत.**

❖ **जे लागु नसेल ते खोडावे**